सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३०३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ७ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ६५ लाखांचे बक्षीस असलेले २६ जहाल माओवादी शरण छत्तीसगडमध्ये पोलिसांच्या मोहिमेला मोठे यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ गडचिरोली**

छत्तीसगडमधील नक्षलवादाचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांच्या कंबरडे मोडणारी कामगिरी केली आहे. पोलिसांच्या वाढत्या दबावामुळे आणि नक्षली विचारधारेतील पोकळपणाला कंटाळून ७ जानेवारी रोजी सकाळी २६ जहाल नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर शरणागती पत्करली. विशेष म्हणजे, यात ६५ लाखांचे इनाम असलेल्या १३ जहाल नक्षलवाद्यांचा समावेश असून, या मोठ्या यशामुळे बस्तर विभागात नक्षली चळवळीला मोठा हादरा बसला आहे.



आत्मसमर्पण केलेल्या २६ नक्षलवाद्यांमध्ये ७ महिला कॅडर्सचा समावेश आहे. माओवादी कंपनीची समिती सदस्य लाली ऊर्फ मुचाकी आयते लखमू (३५) हिनेही शस्त्र खाली ठेवले. २०१७ मध्ये ओडिशातील कोरापूट रोडवर पोलिसांचे वाहन आयईडी स्फोट घडवून उडविले होते, यामागे लाली ही मास्टरमाईंड होती. यासोबत हेमला लखमा (४१), अस्मिता उर्फ कमलू सन्नी (२०), रामबती उर्फ पदम जोगी (२१), सुंदर पाले (२०) यांचाही समावेश आहे. हे सर्वजण गेल्या अनेक वर्षांपासून विविध हिंसक कारवायांमध्ये सक्रिय होते. मात्र, शासनाच्या पुनर्वसन धोरणामुळे प्रभावित होऊन त्यांनी मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला. जिल्हा मुख्यालयी पोलिस अधीक्षकांसमोर त्यांनी आपली शस्त्रे खाली ठेवून शांततेचा मार्ग स्वीकारला.

**मोठ्या हल्ल्यांचे धागेदोरे मिळणार?**

एकाच वेळी २६ नक्षलवादी शरण आल्यामुळे पोलिसांच्या हाती महत्त्वाची माहिती लागण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत झालेल्या मोठ्या नक्षली हल्ल्यांचे नियोजन आणि त्यातील सहभागी नेत्यांची माहिती यातून समोर येऊ शकते. या ऐतिहासिक आत्म समर्पणानंतर नक्षली चळवळीची ताकद मोठ्या प्रमाणावर क्षीण झाल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. सुकमा पोलिसांकडून नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'पुना मारगेम' (नवी पहाट) ही विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत नक्षलवाद्यांना हिंसेचा मार्ग सोडण्याचे आवाहन केले जाते.




## माजी खासदार इम्तियाज जलील यांना मारहाण, संभाजीनगरचे वातावरण तापले

### नाराज कार्यकर्त्यांनी केला मारहाण करण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७संभाजी नगर**

महापालिका निवडणुकीचा प्रचार ऐन रंगात आलाय. एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांना संभाजीनगरमध्ये मारहाण झाली आहे. नाराज कार्यकर्त्यांनी जलील यांची कार रोखली. संतापलेल्या कार्यकर्त्यांनी कारवर धडाधड बुक्या अन् पायांनी मारहाण केली. त्याशिवाय जलील यांनाही मारहाणकरण्याचा प्रयत्न झाला या प्रकारानंतर संभाजनगरमधील वातावरण चांगलेच तापलेय.

छत्रपती संभाजीनगरमधील बायजीपुऱ्यात जलील यांना मारहाण झाली. एमआयएमचे कार्यकर्ते आणि एमआयएमचे नाराज कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा आणि हाणामारी झाली. एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज झालेली हे त्या भागातून पदयात्रा काढत होते. पदयात्रा सुरू झाल्यानंतर त्यांना विरोध होत होता. जलील त्यांच्यासमोरच हा राडा झाला. जलील यांना आधी काळे झेंडे दाखवण्यात आले. त्यानंतर आडवले अन् हाणामारी झाली.



यावेळी दोन गटांमध्ये हमारीतुमरी होऊन हाणामारी झाली. त्यावेळी पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. पोलिसांना सौम्य लाठीचार्ज केला.

२०१४ पासून मराठवाड्यात पाय रोवणाऱ्या, मुस्लिम बहुल भागात वर्चस्व असणाऱ्या आणि मुस्लिम बहुल भागामध्ये एकतर्फी विजय मिळवणाऱ्या एमआयएमला छत्रपती संभाजीनगरमध्ये मुस्लिम बहुल भागातच विरोध होऊ लागला आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील बायजीपुरा भागांमध्ये एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील हे पदयात्रा काढताना त्यांना काळे झेंडे दाखवण्यात आले. त्यामुळे त्यांना पदयात्रा वळवून दुसऱ्या गल्लीत घेऊन जावी लागली. त्यानंतरही काळे झेंडे दाखवणारे आणि विरोध करणारे लोक त्यांच्या मागे काळे झेंडे घेऊन फिरत होते. ज्यांनी दहा-बारा वर्ष एमआयएम साठी काम केलं, त्यांना तिकीट दिले नाही म्हणून लोक विरोध करीत असल्याची प्रतिक्रिया बंडखोरी केलेल्या आणि काँग्रेसमधून पुरस्कृत उमेदवाराचे म्हणणे आहे. तर इम्तियाज जलील यांनी सोळा तारखेला हा विरोध कळेल अशी प्रतिक्रिया दिलीय.

**पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर**

या घटनेमुळे एमआयएममधील अंतर्गत गटबाजी उघड झाली आहे. प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीतच अशा प्रकारे राडा झाल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. या गोंधळानंतर पदयात्रेच्या सुरक्षेमध्ये वाढ करण्यात आली आहे.

## कोणत्याही परिस्थितीत भाजपसोबत जाणार नाही अकोटमधील आघाडीवर इम्तियाज जलील

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७संभाजी नगर**

अंबरनाथ आणि अकोट येथे स्थानिक पातळीवर भाजपाने काँग्रेस आणि -खचखच् सोबत आघाडी केल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे. स्थानिक नेत्यांच्या या कृत्यामुळे तिन्ही पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी जाहीर नाराजी आणि विरोध केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा स्थानिक आघाड्या तोडण्याचे आदेश दिल्यानंतर, आता -खचखच् नेही भाजपाबरोबर जाणार नसल्याची ठाम भूमिका मांडली आहे.

इम्तियाज जलील पुढे म्हणाले, आतापर्यंत आम्ही भाजपाविरोधात राजकारण केले आहे. या भूमिकेशी आम्ही कधीही तडजोड करणार नाही. ज्या पक्षाने देशात जात-धर्माच्या नावावर तेढ निर्माण केला आहे, त्या पक्षासोबत आम्ही बसणार नाही. त्यामुळेच आमच्या पाचही नगरसेवकांना संबंधित आघाडीतून बाहेर पडत असल्याचे लेखी स्वरुपात देण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्रात कुठेही, कोणतीही आघाडी झाली तरी -खचखच् भाजपाबरोबर जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणावर -खचखचचे राष्ट्रीय अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांचीही नाराजी असल्याचे जलील यांनी सांगितले. ते म्हणाले की, विदर्भाची जबाबदारी युसुफ अन्सारी यांच्याकडे देण्यात आली आहे. मात्र, इतका महत्त्वाचा निर्णय घेण्याआधी वरिष्ठांशी चर्चा व्हायला हवी होती. याबाबत त्यांच्याकडूनही आम्ही लेखी खुलासा मागवला आहे. विकासाचा मुद्दा आमच्यासाठी महत्त्वाचा असला, तरी भाजपाबरोबर जाणे आम्हाला मान्य नाही.

## किडनीचा पहिला रिसिव्हर सापडला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७चंद्रपूर**

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या चंद्रपूर किडनी विक्री प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. त्रिची येथील स्टार किम्स हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेद्वारे काढलेली किडनी स्वीकारणारी पहिली व्यक्ती पोलिसांना निष्पन्न झाली असून, तो काही दिवसांत चंद्रपूर पोलिसांसमोर हजर होणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे या व्यक्तीचा कर्नाटकची राजधानी बंगळुरूशी थेट संबंध असल्याचे समजते.

किडनी डोनरला अवघे ८ लाख रुपये दिले जात असताना तीच किडनी गरजू; पण धनाढ्य रुग्णाला तब्बल एक कोटी रुपयांत विकली जात होती. या काळ्या बाजारातून कोट्यवधींचा गैरव्यवहार झाल्याचे आणि हवालामार्फत पैसे विदेशात पाठवण्यात आल्याचा संशय पोलिस सूत्रांनी व्यक्त केला आहे. दरम्यान उत्तर प्रदेशातून पोलिसांच्या हाती लागलेला किडनी पीडित मोहम्मद तारीक खान (३६, रा. लखनौ) याची किडनी त्रिची येथे काढण्यात आली. ही शस्त्रक्रिया डॉ. रवींद्रपाल सिंग आणि डॉ. राजरत्नम गोविंदसामी यांनीच केल्याचे तारीकने पोलिसांना सांगितले. फोटो पाहून दोघांची ओळखही पटवली आहे.

रोशन कुळे याच्यासोबत मोहम्मद तारीक खान, शंकर, मनोज व सुमित हे डॉ. कृष्णा आणि हिमांशू भारद्वाज यांच्यासह कंबोडियाला गेले होते. तपासणीत तारीकचे रक्त कमी असल्याचे आणि त्याचा रक्तगट दुर्मीळ 'ओ' निगेटिव्ह असल्याने कंबोडियात शस्त्रक्रिया होऊ शकली नाही. दुसऱ्या ब्लडबँकेमधूनही आवश्यक रक्त उपलब्ध न झाल्याने तो भारतात परतला. मात्र, महिनाभरानंतर डॉ. कृष्णाने पुन्हा संपर्क साधत 'कंबोडियाला जाण्याची गरज नाही, त्रिचीतच किडनी काढता येईल', असे आमिष दाखवले. त्याबदल्यात तीन लाख रुपये कमी करून फक्त पाच लाख रुपये देण्यात येतील, असे सांगण्यात आले. आर्थिक अडचणीत असल्याने तारीक किडनी डोनेट करण्यास तयार झाला.

## आरक्षण मिळाल्यानंतर पुन्हा जनरल कॅटेगरीवर दावा करता येणार नाही; सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नवी दिल्ली**



सर्वोच्च न्यायालयाने अलीकडे दिलेल्या दोन महत्त्वाच्या निर्णयांत 'जनरल (अनारक्षित) कॅटेगरी' या संकल्पनेचा अर्थ आणि मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. या निकालांमधून एक मूलभूत तत्त्व ठळकपणे समोर आले आहे. आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने कोणतीही सवलत न घेता गुणवत्तेच्या जोरावर यश मिळवले असल्यास, तो जनरल कॅटेगरीत समाविष्ट होऊ शकतो; मात्र निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर सवलत घेतली असल्यास, जनरल जागेवर दावा करता येणार नाही.एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार, १९ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने राजस्थान उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवत स्पष्ट केले की, आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने कोणतीही विशेष सवलत किंवा शिथिलता न घेता जनरल कट-ऑफपेक्षा जास्त गुण मिळवले असल्यास, त्याचा समावेश जनरल यादीत करणे बंधनकारक आहे. मात्र, ६ जानेवारी रोजी कर्नाटकातील एका प्रकरणात न्यायालयाने याच्या उलट भूमिका घेत, प्रीलिम्स परीक्षेत आरक्षणाचा लाभ घेतलेल्या अनुसूचित जातीतील उमेदवाराला भारतीय वन सेवा च्या अनारक्षित कॅडरमध्ये नियुक्ती देण्यास नकार दिला. या दोन्ही निकालांमधून 'जनरल कॅटेगरी'संदर्भातील कायदेशीर भूमिका अधिक ठोस झाली आहे, असे मत या प्रकरणात बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कार्तिक सेठ यांनी व्यक्त केले. त्यांच्या मते, हा निर्णय कोणताही नवा कायदा मांडत नाही. तो फक्त आधीच निश्चित झालेल्या तत्त्वाची पुनःपुष्टी करतो. विशेषतः इंदिरा सहनी प्रकरण निकालात ठरवलेल्या समानतेच्या तत्त्वानुसार, गुणवत्तेच्या आधारे निवड झालेल्या आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना जनरल जागांवर स्थान देता येते, परंतु फक्त तेव्हाच, जेव्हा त्यांनी कोणतीही सवलत घेतलेली नसते.

## संपादकीय ......

# सत्तेचा अहंकार उसळतो तेव्हा!

*लोकशाहीतील निवडणुकीच्या राजकारणात जय-पराजय अटळ आहे. एकदा एक पक्ष सत्ता स्थानावर असेल तर दुसर्या वेळेस तोच पक्ष पुन्हा तिथे असेलच असे नाही. ते स्थान ढळणारे आहे, कोणासाठीही अढळ नाही. मात्र पक्षाची विचारधारा, ध्येयधोरणे ही कायमस्वरूपी असतात. तेही कालानुरुप परिवर्तनीय होत असतातच. परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. आता केंद्र आणि राज्यात सत्तेवर असलेल्या भाजपला नगरपरिषदांनंतर महापालिकांमध्ये सत्ता हवी आहे. यासाठी भाजप नेत्यांचे काफिले शहर-शहर धुंडाळत आहेत. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थाच तेवढ्या भाजपला काबीज करायच्या राहिल्या आहेत. त्यासाठीचा मुहूर्त निघालाय येत्या १५ तारखेचा.*

*प्रचारासाठी मोजून सहा ते सात दिवस शिल्लक राहिले आहेत. ठाकरे बंधूंची शिवशक्ती मुंबई लिमिटेड लढाई लढत आहे, तर उर्वरित शिंदेसेना एमएमआर रिजनमध्ये जोर लावून आहे. पवारांची भाऊबंदकी पुणे, पिंपरी-चिंचवडसाठी पुन्हा एक झाली आहे. उर्वरित महाराष्ट्रातील संस्थानं जो तो संस्थानिक भाजपपासून वाचवण्याचा आपापल्या पक्षाच्या झेंड्याखाली प्रयत्न करतोय. त्यातही ही निवडणूक शहरांची मालकी कोणाकडे हे ठरवणारी असल्यामुळे भाजपला सर्वच ठिकाणी मोदी-फडणवीस यांचे नाव आणि चेहरा पुढे करून संस्थानं खालसा करणे, भाऊबंदकीचं राजकारण संपवणं, कुटुंबांची एकाधिकारशाही मोडीत काढण्याची नामी संधी मिळालीय. या लढाईत भाजपचे नेतृत्त्व एकदम शहरी तोंडवळा असलेल्या रवींद्र चव्हाणांकडे आहे.*

*मुळातच भाजपची वाढ शहरी भागात झाली. या पक्षाचा तोंडवळा नेहमीच शहरी राहिला आहे. काही अपवाद राहिले आहेत, नाही असे नाही, त्यातील ठळकपणे समोर आलेले रावसाहेब दानवे आणि काही प्रमाणात चंद्रशेखर बावनकुळे. आता भाजप सर्वव्यापी झाला असल्याचा आभास निर्माण केला जात असला तरी पक्षाला गोपीनाथ मुंडेंसारखा मास लिडर अद्याप मिळालेला नाही. विद्यमान अध्यक्ष रवींद्र चव्हाण हे कायम शर्ट आणि जिन्स पँटवर असतात, त्यातून आपण सामान्य माणूस असल्याचा आभास निर्माण करण्याचा आणि शहरी मानसिकतेला अपील होण्याचा त्यांचा प्रयत्न. राजकारण हा शक्य अशक्यतांचा खेळ, तसाच तो प्रतिमांचाही आहे. रवींद्र चव्हाण यांची प्रतिमादेखील शहरी आणि त्यांची विचारसरणीदेखील. शहरी मानसिकता ही 'मी आणि माझं कुटुंब' एवढ्यापुरतीच मर्यादित असते. त्यातही चव्हाण हे डोंबिवलीचे, म्हणजे त्यांचे नेतृत्त्व हे पूर्णपणे शहरीकरणातच तयार झालेले.*

*नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत रवींद्र चव्हाणांवर राणे बंधूंपैकी आमदार निलेश राणेंनी जाहीर नाराजी व्यक्त केली, तसेच आव्हानही दिले. यामुळे राणे बंधूंसोबत चव्हाणही चर्चेत आले. अखेर सिंधुदुर्गात राणेंचेच वर्चस्व राहणार हे सिंधुदुर्गाने दाखवून दिले. त्याआधी चव्हाण भिडले थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे चिरंजीव डॉ. श्रीकांत शिंदेंना. ठाणे, कल्याण-डोंबिवलीत शिंदेंच्या शिवसेनेत कोणाला शिल्लकच ठेवायचे नाही, असा जणू विडाच त्यांनी उचलला. त्यातच दिल्लीतील नेतृत्त्वाने कुबड्यांची गरज राहिली नसल्याची शाबासकी दिल्याने यांच्या 'संपवणे' या महत्त्वाकांक्षेला अधिकच जोर आला.*

*आपल्याच मित्रपक्षाला संपवण्याची भाषा सुरू झाली. मग उलट टपाली जेव्हा अहंकाराचा रावण जाळण्याचे आव्हान मिळाले आणि दिल्लीतून निरोप आला तेव्हा कुठे संपवण्याच्या कार्यक्रमाला ब्रेक लागला. मनपा निवडणुकीत दोन्ही सहकार्यांना शेवटपर्यंत झुलवत ठेवण्यात आले. यामध्ये नेमका अट्टाहास केंद्राचा, राज्याचा की मुख्य नेतृत्त्वाचा हे कळायला मार्ग नाही. तसा या पक्षाचा स्वभाव गिळंकृत करण्याचाच. मग त्यात सहकारीच नाही तर स्वतःचे नेतृत्त्वही अडगळीत टाकण्याच्या परंपरेचं पेटंटही यांच्याकडेच. भाजप स्थापन करणार्यांमधील लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशींना २०१४ नंतर त्यांचेच शिष्य विसरले. तिथे विरोधी पक्षातील दिवंगत नेत्यांच्या आठवणी पुसून टाकण्याची इच्छा झाली तर त्यात नवल ते काय? पण ज्यांच्या आठवणी संपवण्याची तयारी केली ते नेतृत्त्व शहरी नव्हे.*

*शहरी अस्मिता बोथट केल्या असल्या तरी अजून ग्रामीण महाराष्ट्राची अस्मिता जिवंत आहे. त्यांनी ते सहन केले नाही. विलासरावांच्या आठवणी संपवू म्हणणार्या रवींद्र चव्हाणांना २४ तासांत जाहीर माफीनामा सादर करावा लागला. विलासराव देशमुख हे काही फक्त लातूरचे नेते नव्हते. सरपंचपदापासून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि डॉ. मनमोहन सिंगांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय मंत्री होते. विलासराव देशमुखांच्या अप्रत्यक्ष मदतीनेच १९९५ मध्ये भाजप राज्यात पहिल्यांदा सत्तेत आली होती, याची तरी आठवण चव्हाणांनी ठेवायला पाहिजे. त्यांना ३० वर्षांचा इतिहास आठवत नसेल तर त्यांना ज्यांच्या भूमिकेत जाण्याची इच्छा आहे, त्यांच्याकडून त्यांनी याचे धडे घ्यायला हरकत नाही. मात्र एका राष्ट्रीय पक्षाच्या प्रदेशाध्यक्षाने, जो पक्ष वारंवार संस्कृतीचे धडे सगळ्यांना देतो त्यांनाच लोकशाहीतील संस्कृतीचा विसर पडणे हा सत्तेचाच अहंकार दुसरं काय! अशा अहंकारी नेत्यांना जनताही फार काळ लक्षात ठेवत नाही, याचा मात्र चव्हाणांना विसर पडायला नको.*

# यंदा मकर संक्राती १४ की १५ जानेवारीला?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** - हिंदू धर्मात 'मकर संक्रात' हा महत्वाचा सण आहे. वर्षाचा पहिला सण मकर संक्रात असतो. हा सण सूर्य जेव्हा मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा साजरा केला जातो. या दिवशी दानधर्म, स्नान आणि पूजा करणे याला विशेष महत्त्व आहे. दरम्यान, यंदा मकर संक्रात १४ की १५ जानेवारीला आहे याबाबत संभ्रम दिसून येत आहे.आजच्या लेखात जाणून घेऊयात २०२६ मध्ये मकर संक्रात नक्की कधी आहे आणि पूजाविधी याविषयी सविस्तरपणे,




**मकर संक्राती १४ की १५ जानेवारी?** -२०२६ मध्ये मकर संक्राती १४ जानेवारी रोजी आहे. सूर्य दुपारी ३ वाजून ६ मिनिटांनी मकर राशीत प्रवेश करत आहेत. त्यामुळे पुण्यकाळाची सुरुवात सकाळी ८ वाजून ४२ मिनिटांनी होईल. यंदा मकर संक्रातीच्या दिवशी एकादशीचा योग आहे. त्यामुळे यंदा सूर्यदेवाबरोबर श्री विष्णूंचा आशीर्वाद मिळेल. म्हणून, मकर संक्रातीचा सण यंदा १४ जानेवारी रोजी साजरा होणार आहे.

**पूजाविधी** - मकर संक्रांतीच्या दिवशी समृद्धीचे प्रतीक म्हणून सुवासिनी महिला सुगड्यांची पूजा करतात. या सुगड्यांमध्ये धन-धान्य भरण्यात येते. यानंतर सुगड्यांना दोऱ्याने बांधले जाते. त्यानंतर हळद-कुंकू लावून त्यामध्ये ऊसाचे काप टाकले जातात, त्याबरोबरच तीळ गुळ, गाजर, गव्हाच्या लोंब्या, बोरे टाकली जातात. यानंतर एका शुभ्र वस्त्राने झाकून प्रार्थना केली जाते. तीळ गुळ देऊन छोट्या भेटवस्तू देऊन हा सण साजरा करतात. या भेटवस्तूंना वाण म्हणून संबोधले जाते.

# 'काँग्रेस का हाथ, भाजप के साथ'; भ्रष्टाचारमुक्त शहराचा नारा, 'एकनाथां'चा सोडला हात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अंबरनाथ-** : अंबरनाथ नगरपालिकेवर भाजपने आपला नगराध्यक्ष बसवल्यानंतर आता सर्वाधिक २७ नगरसेवक असलेल्या शिंदेसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी भाजपने काँग्रेस व राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षासोबत हातमिळवणी करीत 'अंबरनाथ विकास आघाडी' स्थापन केली असून, या गटाची नोंदणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. या गटात भाजपचे १४, काँग्रेसचे १२, तर राष्ट्रवादी (अजित पवार)चे चार व एक अपक्ष असे ३१ नगरसेवक आहेत. नगराध्यक्षांसह ही संख्या ३२ होते. अंबरनाथ नगरपालिकेला भ्रष्टाचार आणि भयमुक्त करण्याकरिता हा निर्णय घेतल्याचा दावा भाजपने केला.



महापालिका निवडणुकीच्या गदारोळात शिंदेसेनेला हा मोठा धक्का मानला जात आहे.निवडणुकीच्या निकालानंतर शिंदेसेना सर्वांत मोठा पक्ष ठरला. मात्र, भाजपने नगराध्यक्षपदावर बाजी मारली. शिंदेसेनेसोबत न जाता भयमुक्त आणि भ्रष्टाचारमुक्त कारभाराचा नारा देत भाजपने अंबरनाथ विकास आघाडी हा गट नोंदणीकृत केला. अंबरनाथच्या निवडणुकीत भाजप आणि शिंदेसेना यांच्यात नगराध्यक्षपदाच्या लढतीत भ्रष्टाचाराचा मुद्दा भाजपने पुढे केला होता. शिंदेसेनेतील काही पदाधिकाऱ्यांना भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी उघड विरोध दर्शवला असून, सत्तेत त्यांचा सहभाग भाजपला नको होता.काँग्रेस आणि राष्ट्रवादी (अजित पवार) या दोन्ही पक्षांनी शिंदेसेनेकडे न जाता भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला. सर्व समित्यांवर त्यांचे सदस्य अधिक राहतील.शहरवासीयांना अभिप्रेत असलेला विकास व्हावा, या दृष्टिकोनातून स्थानिक पातळीवर आम्ही एकत्रित आलो आहोत. शहराच्या शाश्वत विकासासाठी आम्ही कटिबद्ध राहू. द्वेषाचे राजकारण सोडून शहर विकासाचे राजकारण करू.

**- प्रदीप पाटील,** गटनेते, काँग्रेस.

# पाठदुखी-कंबरदुखीनं जीव हैराण झाला? अंथरुणावर करा ४ व्यायाम

**दि.७ विदर्भ प्रजासत्ताक**

हल्ली बऱ्याच महिलांचं एक कॉमन दुखणं म्हणजे पाठ आणि कंबर... दिवसभर कामात असताना एवढं जाणवत नाही, पण रात्री अंथरुणावर पाठ टेकताच मात्र आपली पाठ आणि कंबर किती गळून गेली आहे याची जाणीव खूप तिव्रतेने होऊ लागते.






पहिल्या बाळंतपणानंतर बहुतांश स्त्रियांना हा त्रास सुरू होतो. शरीरात कॅल्शियमची कमतरता असणे, टु- व्हीलर चालवण्याचे प्रमाण जास्त असणे, लॅपटॉपवर काम करताना किंवा एरवीही चुकीच्या पद्धतीने बसणे या सगळया गोष्टींमुळे पाठ, कंबरेवरचा ताण वाढतो आणि ती भयंकर दुखू लागते. अशावेळी प्रत्येकीकडे व्यायामासाठी वेळ असतोच असे नाही. किंवा वेळ असला तरी तासनतास व्यायाम करण्याचा कंटाळा येतो. म्हणूनच पुढे सांगितलेले काही व्यायाम पाहा हे व्यायाम तुम्ही अंथरुणावर पडूनच करू शकता. त्यामुळे त्याच्यासाठी वेगळा वेळ काढण्याची गरज नाही.

पाठ- कंबरेचं दुखणं कमी करण्यासाठी व्यायाम

१. हे व्यायाम करण्यासाठी पाठीवर झोपा. तुम्ही योगा मॅटचा वापर केला तर अधिक चांगले. यानंतर दोन्ही हात दोन्ही बाजूंना पसरवून ठेवा. पायांमध्ये थोडं अंतर घ्या. दोन्ही पायांचे अंगठे जमिनीवर टेकवा आणि नंतर पुन्हा तळपाय लांबवून करंगळी जमिनीवर टेकवा. असं एकानंतर एक १० ते १५ वेळा करा.

२. दुसरा व्यायाम करण्यासाठी एका तळपायावर दुसरा तळपाय ठेवा. यानंतर दोन्ही तळपाय एकदा उजव्या बाजुला वळवून तर एकदा डाव्या बाजुला वळवून जमिनीवर टेकवा. असंही दोन्ही बाजुंनी प्रत्येकी १०- १० वेळा करा.

३. एक पाय गुडघ्यात वाकवा. त्यावर दुसरा पाय ठेवा आणि त्यानंतर एकदा पाय उजव्या बाजुला तर एकदा डाव्या बाजुला टेकवा. मांडीचा भागा जमिनीला टेकायला हवा. एकानंतर एक या पद्धतीने दोन्ही पायाने प्रत्येकी एखाद्या मिनिटासाठी हा व्यायाम करावा.

ब्रेकआऊट्स, क्ने वाढल्याने कमी वयातच वयस्कर दिसता? ३ सोपे घरगुती उपाय, क्ने जाऊन सौंदर्य खुलेल...

४. दोन्ही पायांमध्ये अंतर घेऊन ते गुडघ्यामध्ये वाकवा. यानंतर उजवा गुडघा डाव्या तळपायाजवळ तर डावा गुडघा उजव्या तळपायाजवळ टेकवा. असं दोन्ही पायांनी २५ ते ३० वेळा करा. मर्कटासन केल्यानेही पाठीचं, कंबरेचं दुखणं बऱ्याच प्रमाणात कमी होतं.

# ट्रॅक्टरने आणि दलदलयुक्त जमिनीत तीळ पेरणी करू नये, वाचा संपूर्ण तीळ लागवड तंत्रज्ञान

**दि.७ विदर्भ प्रजासत्ताक**

तीळ तेलात सिसामीन आणि सिसामोल हे दोन महत्वाचे घटक असलेने आयुर्वेदात तीळ पिकास अनन्यसाधारण महत्व आहे. पुढील महिन्यात तिळाच्या लागवडीला प्रारंभ होईल. तिळाच्या दर्जेदार आणि अधिक उत्पादनासाठी लागवड तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक आहे.

**नव्याने तीळ लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्वाच्या काही गोष्टी :**

जमीन : जमीन खोल नांगरून तयार करावी.

शेणखत : ५ टन/हेक्टरी जमिनीत टाकावे.

जमीन भुसभुशीत करून फळी मारून सपाट करावी.

पेरणी : पेरणी बैल पाभरीने किंव्हा टोकन पद्धतीने करावी.

बियाणे पेरणीची खोली : जमिनीत २.५ सेंटीमीटर खोली इतक्या खोलीवर बियाणे पेरावे. जमिनीत २.५ सेंटीमीटर खोली पेक्षा जास्त खोलीवर टाकल्यास बियाणे उगवत नाही. म्हणून पेरणी करतांना योग्य ती काळजी घावी.

ट्रॅक्टरने पेरणी करू नये. कारण ट्रॅक्टरला लावलेल्या पाभरीने बियाणे २.५ सेंटीमीटर खोलीवर न पडता त्याहून अधिक खोलीवर पडून पुढे उगवनक्षमता अतिशय कमी होते. म्हणून ट्रॅक्टरने पेरणी करणे टाळावे.

वाळलेल्या शेणाच्या गोवऱ्या कुटून बारीक पावडर तयार करून चाळणीने गाळून घ्यावी. या पावडरमध्ये तीळ बियाणे एकत्रित करून पाभरीने पेरणी करावी.

साधारणपणे १ किलो बियाणात ५ किलो गोवऱ्या कुटलेली पावडर एकत्रित करून पाभरीने पेरणी करावी.

पेरणी अंतर : ४५ ु १० सेंटीमीटर अंतरावर करावी.

बियाणे : २.५ किलो/हेक्टर तीळ बियाणे वापरावे

सुधारित जाती : फुले पूर्णा, टी एल टी - १०, एकेटी-१०१, एन टी ११

पेरणीची वेळ : १५ जानेवारी नंतर कमीत कमी तापमान २० डिग्री सेल्सिअस च्या वर गेल्यावर. कमी तापमानात उगवण क्षमतेवर परिणाम होतो.

खत व्यस्थापन : ५० किलो नत्र/हेक्टरी विभागून द्यावा.

पहिला नत्राचा हप्ता : २५ किलो नत्र/हेक्टरी पेरणीचे वेळी द्यावा.




दुसरा नत्राचा हप्ता : २५ किलो नत्र/हेक्टरी पिक ३० दिवसाचे पिक झाल्यानंतर द्यावा.

जमिनीत पुरेसा ओलावा असतांना पेरणी करावी.

तीळ हे पिक जास्त पाण्याला अतिशय संवेदनशील असलेने दलदल असलेल्या भागात पेरणी करू नये.

विरळणी : पिक उगवण झाल्यानंतर पहिली विरळणी १५ दिवसांनी करावी. दुसरी विरळणी ३० दिवसांनी करावी.

पिक संरक्षण : तीळ पिकावर पाने कुरतडणारी अळीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास क्विनोल्फोस १मिली.प्रती लिटर पाणी या प्रमाणे पिकावर फवारणी करावी.

कोळपणी : पेरणीचे अंतर ४५ ु १० सेंटीमीटर असलेने बैल कोळप्याने पहिली कोळपणी पिक ३० दिवसाचे असतांना करावी.

प्रथम निंदनी : पिक ३० दिवसाचे असतांना करावी.

दुसरी कोळपणी : ४५ दिवसांनी करावी.

दुसरी निंदनी : तण तीव्रता बघून पिक ६० दिवसाचे असतांना दुसरी निंदनी करावी.

पिक काढणी : साधारणपणे तिळाच्या बोन्ड्या पिवळसर झाल्याने कापणी करावी.

कापणी केल्यावर पेंढ्या बांधून त्यांच्या खोपड्या करून वाळवाव्यात.

साधारणपणे काढणीनंतर १० ते १५ दिवस पेंढ्या वाळवाव्यात. त्यानंतर जागेवरच तीळ बियाणे पेंढ्या उलटच्या करून झटकून घ्यावे.

उत्पन्न : ७ ते ८ क्विंटल/हेक्टरी.

**- डॉ.सुमेरसिंग राजपूत,** तीळ पैदासकार अखिल भारतीय समन्वित तीळ सुधार प्रकल्प, तेलबिया संशोधन केंद्र,जळगाव.

# ई.व्ही.एम. प्रशिक्षणात आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या महत्त्वपूर्ण सूचना

## निवडणूक प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यावर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती-** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व कार्यक्षमरीत्या राबविण्याच्या दृष्टीने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय अधिकारी (नज) यांच्यासाठी ई.व्ही.एम. (इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन) संदर्भात सविस्तर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर प्रशिक्षण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, अमरावती येथे पार पडले. या प्रशिक्षण कार्यक्रमात ई.व्ही.एम. मशीनची रचना, कार्यपद्धती, मतदान प्रक्रियेपूर्वीची तयारी, मतदानाच्या दिवशी करावयाची कार्यवाही, तसेच मतदानानंतरची सुरक्षित साठवणूक व मतमोजणी प्रक्रियेबाबत सखोल माहिती देण्यात आली. यासोबतच ई.व्ही.एम. संदर्भातील नियम, मार्गदर्शक सूचना, आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी तसेच तक्रार निवारण प्रक्रियेवरही प्रकाश टाकण्यात आला. निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीचा कणा असून ती कोणत्याही त्रुटीशिवाय पार पाडणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी अधिकारी व कर्मचारी यांना अद्ययावत प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे ई.व्ही.एम. मशीन हाताळण्याची माहिती देण्यात आल्यामुळे सहभागी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाला निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक अधिकारी तसेच संबंधित विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणामुळे आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने अधिकारी अधिक सज्ज होतील व निवडणूक प्रक्रिया अधिक सुकर, पारदर्शक व विश्वासार्ह पद्धतीने पार पडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी ई.व्ही.एम. प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान उपस्थित निवडणूक निर्णय अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुढील महत्त्वपूर्ण सूचना दिल्या की, निवडणूक प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक व निष्पक्ष ठेवावी. कोणत्याही परिस्थितीत नियमांचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घ्यावी. ई.व्ही.एम. मशीनची हाताळणी अत्यंत काळजीपूर्वक करावी. मशीनची सुरक्षितता, सीलिंग व साठवणूक करताना मा.राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे



पालन करणे बंधनकारक आहे. प्रत्येक टप्प्यावर लेखी नोंदी व अहवाल अद्ययावत ठेवावेत, जेणेकरून भविष्यात कोणतीही शंका किंवा तक्रार उद्भवणार नाही. मतदानाच्या दिवशी वेळेचे काटेकोर नियोजन करावे व मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडेल यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवावी. मतदारांना योग्य व सुस्पष्ट माहिती द्यावी, तसेच त्यांच्या अडचणींवर तत्काळ उपाययोजना करावी. आपत्कालीन परिस्थितीत घाबरून न जाता नियमानुसार कार्यवाही करावी व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा. सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी टीमवर्कच्या भावनेने काम करावे आणि आपसातील समन्वय राखून जबाबदाऱ्या पार पाडाव्यात. मा.निवडणूक आयोगाने दिलेल्या प्रशिक्षणाचा प्रभावी वापर प्रत्यक्ष कामात करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. या सूचनांचे काटेकोर पालन केल्यास निवडणूक प्रक्रिया अधिक विश्वासार्ह, सुरळीत व लोकशाही मूल्यांना अनुरूप पद्धतीने पार पडेल, असा विश्वास आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी व्यक्त केला.

सदर प्रशिक्षणात अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त दादाराव डोलारकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती श्रद्धा बबन उदावंत, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती दुर्गा देवरे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी प्रसन्नजीत चव्हाण, निवडणूक निर्णय अधिकारी तथा वन जमाबंदी अधिकारी विवेकानंद काळकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे, तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, विविध खात्यांचे विभागप्रमुख, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ७ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

# काँग्रेस नेते हिदायत पटेल यांच्यावर चाकूहल्ला

## अकोल्यात उपचारादरम्यान मृत्यू, अकोट तालुक्यात राजकीय तणाव शिगेला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अकोला**

राजकीय पूर्ववैमनस्यातून अकोट तालुक्यात काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांची निर्घृण हत्या करण्यात आली. बुधवारी दुपारी मोहाळा (ता. अकोट) येथे नमाज पठणानंतर मशिदीबाहेर चाकूने प्राणघातक हल्ला झाल्यानंतर गंभीर जखमी अवस्थेत त्यांना अकोला येथील ओझोन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान आज पहाटे साडेतीन वाजता त्यांचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, हिदायत पटेल हे माहोळ गावात असताना काही हल्लेखोरांनी त्यांना घेरले आणि धारदार शस्त्रांनी त्यांच्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात पटेल यांच्या पोटावर आणि मानेवर खोलवर जखमा झाल्या आहेत. भरदिवसा झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात मोठी पळापळ झाली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पटेल यांना तातडीने अकोट येथील रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, अतिरक्तस्राव आणि जखमांचे गांभीर्य लक्षात घेता, प्राथमिक उपचार करून त्यांना तातडीने अकोला येथील मोठ्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. दरम्यान उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.



काकाच्या हत्येचा बदला

२४ मे २०१९ रोजी लोकसभा निवडणुकीदरम्यान मोहाळा येथे भाजप अल्पसंख्याक सेलचे माजी पदाधिकारी मतीन शेरखाँ पटेल (५८) यांची हत्या झाली होती. या प्रकरणी हिदायत पटेल यांच्यासह दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून, त्याची सुनावणी सुरू आहे. त्यामुळे आपल्या काकाच्या हत्येचा बदला घेण्याच्या उद्देशातून हिदायत पटेल यांच्यावर मृत मतीन पटेल यांचा पुतण्या उबेद पटेल याने चाकूने हल्ला केल्याची घटना घडल्याची माहिती गावातील काही प्रत्यक्षदर्शींकडून मिळाली. आमचा त्या दिशेने तपास सुरू आहे, असे अकोट पोलिसांनी सांगितले.

अकोल्यात पोलिसांचा कडक बंदोबस्त

हिदायत पटेल यांच्यावर हल्ला झाल्याचे वृत्त वाऱ्यासारखे पसरताच अकोला आणि अकोटमधील काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रुग्णालयाबाहेर गर्दी केली. कार्यकर्त्यांमधील संताप पाहता आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी अकोला शहरासह माहोळ गावात कडक पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

हिदायत पटेलांनी लढवली लोकसभा

हिदायत पटेल हे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष आणि अकोला जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते. त्यांनी २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवली. अकोला जिल्ह्यातील काँग्रेसचा एक आक्रमक आणि महत्त्वाचा चेहरा म्हणून हिदायत पटेल यांची ओळख आहे.

# नवसारी जवळच्या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मध्ये होणार मतगणना

## मतगणना केंद्राची आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अधिकाऱ्यांसमवेत केली पाहणी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे स्पष्ट करत निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्यासह निवडणूक निर्णय अधिका-यांनी सकाळी स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथे उभारण्यात आलेल्या मतगणना केंद्राच्या कामकाजाची सखोल पाहणी केली.

या पाहणीदरम्यान मतगणना केंद्रावर करण्यात आलेल्या एकूण कामाच्या नियोजनाचा आयुक्तांनी बारकाईने आढावा घेतला. मतगणनेसाठी आवश्यक असलेली भौतिक व्यवस्था, मतमोजणी टेबल्सची मांडणी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था, प्रवेश व निर्गमन मार्ग, सीसीटीव्ही यंत्रणा, विद्युत व अग्निसुरक्षा व्यवस्था, तसेच आपत्कालीन परिस्थितीत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेण्यात आली. यावेळी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी मतगणना प्रक्रिया अत्यंत संवेदनशील असल्याने कोणत्याही प्रकारची निष्काळजीपणा अथवा त्रुटी होऊ नये, यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जबाबदारीने काम करावे, असे निर्देश दिले. मा.राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून मतगणना प्रक्रिया पार पाडण्यावर त्यांनी विशेष भर दिला. पाहणीनंतर आयुक्तांनी स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथे सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत मतगणना प्रक्रियेतील विविध टप्पे, वेळेचे नियोजन, समन्वय, माहिती संप्रेषण, तसेच तक्रारींच्या निवारणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मतगणना प्रक्रिया शांततेत, पारदर्शक व विश्वासार्ह पद्धतीने पार पडण्यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच, मतगणने दरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाशी योग्य समन्वय ठेवण्याचे, तसेच प्रसारमाध्यमे व उमेदवारांच्या प्रतिनिधींना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.प्रशासनामार्फत मतगणना प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या पाहणी व बैठकीस निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती श्रद्धा बबन उदावंत, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती दुर्गा देवरे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी प्रसन्नजीत चव्हाण, निवडणूक निर्णय अधिकारी तथा वन जमाबंदी अधिकारी विवेकानंद काळकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त दादाराव डोलारकर, विविध खात्यांचे विभागप्रमुख, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# १० जानेवारीला गुरू येणार पृथ्वीजवळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती-** आपल्या सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह गुरु हा १० जानेवारीला अगदी सूर्यासमोर येत आहे. या घटनेला खगोलशास्त्रात 'प्रतियुती' असे म्हणतात या दिवशी गुरु सूर्य आमने-सामने राहील. प्रतियुतीच्या काळात ग्रहाचे पृथ्वीपासूनचे अंतर हे सरासरी कमी असते. त्यामुळे खगोल अभ्यासकांना व जिज्ञासुंना गुरुचे निरीक्षण व अभ्यास करण्याची ही एक चांगली संधी असते.गुरुच्या लागोपाठ प्रतियुतीमधील काळ हा साधारण तेरा महिन्यांचा असतो. या आधी ७ नोव्हेंबर २०२४ रोजी गुरु-सूर्य प्रतियुती झाली होती. पृथ्वीपासून गुरूचे सरासरी अंतर हे ९३ कोटी किमी आहे. गुरुचा व्यास १, ४२, ८०० किमी आहे. या ग्रहाला सूर्याभोवती एक चक्कर मारण्यास ११.८६ वर्ष लागतात. गुरुला एकूण ७९ चंद्र आहे. टेलीस्कोपमधून गुरुचे निरीक्षण केले असता गुरुवरचा पट्टा व ४ चंद्र दिसतात. ७ डिसेंबर १९९५ रोजी मानवरहित यान 'गॅलिलीओ' गुरुवर पोहचले. गुरुवर जीवसृष्टी असल्याचा कोणताही पुरावा अजूनपर्यंत मिळाला नाही.

पृथ्वीपेक्षा गुरु हा ११.२५ पट मोठा आहे. रक्तरंगी ठिपका हे एक गुरुचे खास वैशिष्ट्य आहे. 'ग्रेट रेड स्पॉट' या नावाने हा ठिपका ओळखला जातो. हा ठिपका ४० हजार किमी लांब आणि १४ हजार किमी रुंदीचा अवाढव्य आकाराचा आहे. या ठिपक्यात पृथ्वीसारखे ३ ग्रह एकापुढे एक ठेवता येतील. न्यूटनच्या काळापासून म्हणजे

### सूर्य-गुरू प्रतियुती



जवळजवळ ३०० वर्ष हा ठिपका खगोल शास्त्रज्ञ पाहत आले आहे. या ठिपक्याचे निरीक्षण केले असता ते एक प्रचंड चक्रीवादळ असल्याचे सहज लक्षात येईल. गुरुवर सतत घोंगावणारे चक्रीवादळ एका विशिष्ट ठिकाणीच का निर्माण झाले याचे कारण मात्र अजूनही अज्ञात आहे.

१० जानेवारी रोजी सूर्यास्तानंतर थोड्याच वेळात गुरू ग्रह पूर्व क्षितीजावर उगवेल आणि पहाटे पश्चिमेकडे मावळेल. हा ग्रह अत्यंत तेजस्वी दिसत असल्याने तो सहज ओळखता येईल व साध्या डोळ्याने पाहता येईल. परंतु गुरुवरचा ग्रेट रेड स्पॉट व युरोपा, गॅनीमीड, आयो व कॅलेस्टो हे गुरुचे चार चंद्र साध्या डोळ्याने दिसू शकणार नाही. या करिता टेलिस्कोपची आवश्यकता आहे, अशी माहिती मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर व प्रवीण गुल्हाने यांनी दिली आहे.

# ट्रान्सपोर्ट नगरातून २९.४३ लाखांचा गुटखा जप्त, दोघांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती** ट्रान्सपोर्ट नगरातून मंगळवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेच्या पथकाने २९ लाख ४३ हजार ६२० रुपयांचा गुटखा जप्त व दोघांना अटक केली. अन्य पसार आरोपींच्या शोधात पोलीस आहेत.ईश्वर भगवानसिंग सुर्यवंशी (वय ४० रा. आहेरखेडी जि. इंदोर, मध्यप्रदेश), अब्दुल सलीम अब्दुल कादर (वय ३५ रा. ट्रान्सपोर्टनगर) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. तर अवध किशोर पांडे, दानीश, साजीद, साईराम अशी पसार आरोपींची नावे आहेत.गुन्हेशाखेचे पथक नागपुरीगेट परिसरात गस्तीवर असतांना ट्रान्सपोर्टनगर येथील डायमंड ट्रान्सपोर्टसमोर उभ्या असलेल्याट्रकमध्ये (क्र. एम.एच. १५ ई.ई. १८७७) मोठ्या प्रमाणात गुटखा असल्याची माहिती मिळाली. गुन्हेशाखेच्या पथकाने संबंधित



ट्रक उभा दिसताच चालक ईश्वर सुर्यवंशी याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली. त्याने ट्रकमध्ये गुटखा असल्याचे सांगितले. पोलिसांनी अन्न व औषधी अधिकाऱ्यांना माहिती दिली. संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहचले. ट्रकमध्ये वेगवेगळ्याप्रकाराचा गुटखा असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी ट्रक व गुटखा असा एकूण २९ लाख ४३ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त व दोघांना अटक केली. तसेच त्यांची कसून चौकशी केली असता संबंधित गुटखा मध्यप्रदेश येथील अवध पांडे याने पाठवीला असून दानीश, साजीद व साईराम या तिघांना देण्याचे सांगितले होते. त्यामुळे पोलिसांनी त्यांना सुध्दा आरोपी करून त्यांचा शोध सुरू केला आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या मार्गदर्शनात सपोनि मनिष वाकोडे, पोलीस अंमलदार सतीश देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, सैय्यद नाझीम, रंजीत गावंडे आणि प्रभास पोकळे यांचा समावेश होता

# आ. प्रतापदादा अडसड यांच्या वाढदिवसाला वचनपूर्ती

## एक कोटीची ई -लायब्ररी विद्यार्थ्यांच्या सेवेत दाखल

### दत्तापुरात पाच कोटीच्या पुल बांधकामाला होणार सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ धामणगाव रेल्वे**

वाचनालया सोबतच विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे विविध पुस्तकांचा अभ्यास करता यावा यासाठी आज मंगळवारी एक कोटी रुपयांची ई -लायब्ररी विद्यार्थ्यांच्या सेवेतदाखल करण्यात आली तर दत्तापूर भागातील महत्त्वाच्या असलेल्या पाच कोटीच्या पूलाचे भूमिपूजन करण्यात आले. आ प्रतापदादा अडसड यांच्या वाढदिवसा निमित्त धामणगावात वचनपूर्ती ला सुरुवात झाली आहे.शहरातील दत्तापूर भागात विद्यार्थ्यांसोबत नागरिकांना अनेक सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी नगराध्यक्ष अर्चनाताई अडसड रोठे यांनी विकासाचे पहिले पाऊल पुढे टाकले आहे. अमर शहीद भगतसिंग चौक येथे एक कोटीची निर्मित केलेली ई - लायब्ररी विद्यार्थ्यांना समर्पित केल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आता आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे मिळायला सुरुवात झाली आहे. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक आमदार प्रतापदादा अडसड तर अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अर्चनाताई अडसड रोठे ,प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष विजयप्रकाश भैय्या होते. वैशिष्ट्यपूर्ण निधीअंतर्गत मंजूर झालेल्या दत्तापूर भागातील पाच कोटीच्या पुलाचे भूमिपूजन यावेळी आमदार प्रतापदादा अडसड यांच्या हस्ते करण्यात आले.तालुक्यात आज पावेतोएकही शौचालय उपसा यंत्र नव्हते राज्य शासनाकडून येथील नगरपरिषदेलास्वच्छ महाराष्ट्र अभियान ०.२ अंतर्गत २५ लक्ष रुपयांचे शौचालय उपसा यंत्र



वाहन आ. प्रतापदादा अडसड यांच्या प्रयत्नाने मंजूर करून घेतले आहे. आता हे वाहन यंत्र तालुक्यातील जनतेला उपयोगी येणार आहे.यांचे लोकार्पण आ. अडसड यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी नगरसेवक नरेंद्र चौधरी, डॉ. हेमकरण कांकरीया, गिरीश (बंडू) मूंधड़ा, गोपाल द्विवेदी, रवि कुकरेजा, मुरलीधर पतके, दर्शन राठी, जगदीश रॉय, विलास बूटले, अंशुल श्यामलाल बड़गैया, मंजिरी भोगे, प्रतिभा खोब्रागडे, मनिषा शिरभाते, रीना साहू, रंजना शेलोकार, सीमा बागडे, प्रियंका जवंजाळ, काजल उपरीकर, सीमा पेंदाम, अंजली मार्वे यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती

**विद्यार्थ्यांनी मानले आभार**

अमर शहीद भगतसिंग चौक येथे स्पर्धा परीक्षेची तयारी करता यावी यासाठी पूर्वी एक कोटीचे स्वामी विवेकानंद वाचनालय केंद्र तर आता आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे मिळण्यासाठी एक कोटीची ई - लायब्ररी उभारण्यात आल्याने आमदार प्रतापदादा अडसड व नगराध्यक्ष अर्चनाताई अडसड रोठे यांचे येथील उपस्थित विद्यार्थ्यांनी आभार मानले.

**हजारो नागरिकांनी दिल्या शुभेच्छा-** धामणगाव रेल्वे मतदारसंघाचे सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतलेले, शांत संयमी स्वभाव,अभ्यासू व जिज्ञासू व्यक्तिमत्व ,सार्थ समर्थक आणि सक्षम नेतृत्व आमदार प्रतापदादा अडसड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर या तालुक्या सह जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्या धामणगाव येथील दत्त निवासस्थानी एकच गर्दी केली होती सायंकाळी पाच वाजेपर्यंत सहा हजार नागरिकांना त्यांना शुभेच्छा दिल्यात.

# प्रचाराला जोरात प्रारंभ; मात्र महापौरपदाचे आरक्षण केव्हा?

## राज्य शासनाकडून महापौरपदाच्या आरक्षणासाठी तूर्त कोणत्याही हालचाली नाहीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती :**

अमरावती महापालिका निवडणूक प्रचाराला रविवारपासून वेगाने प्रारंभ झाला आहे. मात्र, अमरावतीचा महापौर कोण होणार, याबाबत आरक्षण अद्यापही निघाले नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या महापौर आरक्षण सोडतीकडे लक्ष लागले आहे. महिला की सर्वसामान्य जागेसाठी? कोण होणार नवा महापौर याकडे अंबानगरीवासीयांच्या नजरा लागल्या आहेत. मात्र,




अमरावती महापालिकेत १७महापौरपदासाठीचे व्या आरक्षण सर्वसाधारण महिलांसाठी निघणार आहे. अन्यथा सर्वसाधारण जागेसाठीसुद्धा महापौरपदाचे आरक्षण निघू शकते, असे संकेत मिळू लागले आहेत.

येत्या १५ जानेवारी रोजी मतदान आणि १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता प्रचार संपणार आहे. त्यामुळे मतदारांच्या भेटीगाठी, प्रचार सभा, नेत्यांचे रोड-शो, कार्नर सभा, रॅली यांसह दारोदारी आशीर्वाद घेण्यासाठी उमेदवारांना अवघे ८ दिवस मिळणार आहेत. तर दुसरीकडे भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार), शिंदेसेना, काँग्रेस, युवा स्वाभिमान पक्ष महापालिकेवर सत्ता स्थापनेसाठी दावे-प्रतिदावे करू लागले आहेत. मात्र, महापौरपदाचे आरक्षण जाहीर झाले नसल्याने अमरावतीचा पहिला नागरिक कोण, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. तर दुसरीकडे इच्छुकांचे 'हार्ट बीट' आरक्षणअभावी दरदिवशी वाढत असल्याचे वास्तव आहे.बृहन्मुंबईसह राज्यभरात २९ महापालिकेत महापौरपदासाठी आरक्षण काढण्यात आले नाही. त्यामुळे वेळेवर महापौरपदाचे आरक्षण काढून ते जाहीर करणे ही सत्तापक्ष भाजपची ही नवी 'स्टॅटेजी' असू शकते, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.


### काय आहेत निवडणूक आयोगाचे नियम ?

निवडणूक निकालाच्या एक दिवसापूर्वीसुद्धा महापौरपदाचे आरक्षण काढता येते, अशी राज्य निवडणूक आयोगाची नियमावली आहे. त्यामुळे अमरावती महापालिकेचा नवा महापौर कोण, हे मतदानाच्या दिवशीसुद्धा जाहीर होऊ शकते, असे संकेत आहेत. राज्य शासनाकडून महापौरपदाच्या आरक्षणासाठी तूर्त कोणत्याही हालचाली नाहीत, अशी नगर विकास विभागाची माहिती आहे.

# धुळघाटच्या जंगलातून सालई डिंकाची चोरी

## चार तस्करांना घेतले ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मेळघाट** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अकोट विभागाच्या धुळघाट रेल्वे वन परिक्षेत्रातील बिरोटीच्या जंगलात सालईचे डिंक (सलाई का गोंद) काढताना मध्य प्रदेशच्या चार जणांना पकडल्याने एकच खळबळ उडालेली आहे. मेळघाटच्या जंगलात परप्रांतीय तस्करांचे लागेबांधे पुन्हा सिद्ध झालेले आहे. तीन दिवसापूर्वी धारणीपासून ५० कि. मी. अंतरावरील धुळघाट रेल्वेच्या जंगलातील बिरोटी नियतक्षेत्राच्या वनखंड क्र. १२१७ च्या जंगलातील सालई झाडाच्या डिंकासह चार जणांना पकडण्यात आलेले होते. माहितीप्रमाणे सर्व आरोपी जवळच्या मध्य प्रदेशातील दातपाडी ता. खकनार (जि. बुरहानपूर) येथील असून ते नेहमी सालईचे डिंक काढून तस्करी करण्याचा व्यवसाय करत असावे, अशी दाट शक्यता आहे. एका माहितीनुसार, महाराष्ट्र शासनासह देशातील अनेक राज्य सरकारने सालई झाड कापणे, डिंकांची वाहतूक व साठवण करणे, डिंक काढणे, विक्री व खरेदी करण्यावर प्रतिबंध लावलेले आहे.



सालईचे डिंक ज्वलनशील पदार्थ असून एक रसायन पण आहे. बहुविध उपयोगी सालई डिंकाला आंतरराष्ट्रीय बाजारात फार मागणी असून महाग सुद्धा आहे.

याविषयी मिळालेल्या माहितीप्रमाणे, बिरोटी जंगलाची सीमा मध्य प्रदेशच्या बुरहानपूर जिल्ह्यातील खकनार वनमंडळाला लागून आहे. येथील नागरिक जलतन, इमारती लाकूड, वनोपज आणि वन्य प्राण्यांच्या शिकारीसाठी मेळघाटच्या जंगलात अपप्रवेश करत असतात. वन्य प्राण्यांचे स्थलांतर सुद्धा होत असते. ८ किलो डिंक हस्तगत करण्यात आलेला असून पुढील चौकशी रेंजर चक्रे यांच्या मार्गदर्शनात होत आहे. मध्य प्रदेशातील डिंक तस्करांकडून आधुनिक पद्धतीने सालईच्या झाडातून डिंक काढण्यात येत आहे. या पद्धतीमुळे डिंक जास्त व कमी वेळेत निघतो. मात्र, झाडांना नुकसान होऊन झाडांचे वय कमी होण्याचा धोका असतो.




# निळा झेंडा प्रचारात वापरला तर कारवाई

## प्रचारातील निळ्या ध्वजाच्या वापरावर रिपाई ची प्रथमच कडक भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

फोटो नको महापालिका निवडणूक प्रचारात अशोक चक्रांकित अधिकृत निळ्या ध्वजाचा वापर - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) वगळता इतर कोणत्याही राजकीय पक्षाला करता येणार नाही. असा ध्वज प्रचारात वापरल्यास तो थेट निवडणूक आचारसंहितेचा भंग ठरेल आणि संबंधित पक्षावर निवडणूक आयोगाकडून कारवाई होणे अपेक्षित आहे, असा दावा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियातर्फे करण्यात आला आहे.महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाच्या घटनेतील भाग-३ कलम २२ (१) व उपकलम (९) नुसार अशोक चक्रांकित निळ्या रंगाचा ध्वज हा केवळ रिपाइं या अधिकृत पक्षाचा ध्वज आहे. देशातील अनेक मोठे पक्ष तसेच रिपाइंचे वेगवेगळे गट-तट वर्षानुवर्षे या निळ्या ध्वजाचा वापर मतांच्या राजकारणासाठी करीत आलेले आहेत. मात्र पक्षघटनेतील स्पष्ट कायदेशीर तरतुदीनुसार असा वापर पूर्णतः बेकायदेशीर असल्याचे रिपाइंने यावेळी अधोरेखित केले आहे.निळ्या ध्वजाचा गैरवापर करून समाजाच्या भावना जोडून राजकीय पोळी शेकण्याचे प्रकार अनेक वर्षांपासून सुरू होते. यात भाजप, काँग्रेस, डावे पक्ष तसेच इतर काही राजकीय पक्षांचा समावेश राहिलेला आहे. काही नेत्यांना हाताशी धरून या ध्वजाचा वापर करण्यात आल्याचे वास्तव लपून राहिलेले नाही. आता मात्र रिपाइंने या संदर्भात विशेष खबरदारी घेतली असून अधिकृत परवानगीशिवाय कोणालाही ध्वज वापरू दिला



जाणार नाही, असा इशारा दिला आहे.यासंदर्भात निवडणूक विभागाचे प्रमुख, मनपा आयुक्त तथा महानगरपालिका मुख्य निवडणूक अधिकारी, राज्य निवडणूक आयुक्त यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने पक्षघटनेची प्रत व अधिकृत निळ्या ध्वजाच्या वापराबाबतचे निवेदन सादर केले आहे. गरजपडल्यास गैरवापर करणाऱ्या पक्षांविरोधात न्यायालयात जाण्याचाही इशारा देण्यात आला. पक्षाचे शहराध्यक्ष निर्मल सरदार, केंद्रीय सदस्य तथा शहर उपाध्यक्ष सतीश हरणे, आरपीआय सदस्य दिलीप मकेसर, अमोलसोनटक्के, संजोग सूर्यवंशी, सतीश सूर्यवंशी, मंगेश भाऊ, शरद रोडगे, चंदू गणवीर आदी पदाधिकाऱ्यांनी प्रशासन व निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र देऊन या संवेदनशील विषयाकडे लक्ष वेधले आहे.

बॉक्स)

### काय म्हणते पक्षाच्या घटनेतील तरतूद

रिपाइं पक्षघटनेतील कलम २२ (१) प्रमाणे पक्षाचा ध्वज हा ३ : २ या लांबी, रुंदीच्या प्रमाणातील निळ्या चौकोनी कपड्यावर, मध्यभागी पांढऱ्या रंगाचे अशोक चक्र असलेला राहील. हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा अधिकृत ध्वज असून पक्षातील अधिकृत पदाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही पक्षाने किंवा व्यक्तीने निवडणुकीत त्याचा वापर करू नये. असा गैरवापर केल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याप्रकरणी दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यास पक्ष मोकळा राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रचारातील निळ्या ध्वजाच्या वापरावर प्रथमच एवढी कडक भूमिका रिपाइने घेतल्याने इतर पक्षांसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे.

# गावाची लोकसंख्या १३०० जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे २७ हजार तयार झाली

## यवतमाळच्या गावात फसवणूक, सरकारने चौकशीसाठी एसआयटी स्थापन केली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ यवतमाळ-** महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यात नागरी नोंदणी प्रणाली (उठड) मध्ये मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. १३०० लोकसंख्या असलेल्या शेंदुरसानी ग्रामपंचायतीमध्ये २७ हजार जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्रे जारी झाल्याचे प्रकरण समोर आले आहे.राज्य सरकारने या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक (डखढ) स्थापन केले आहे. अधिकाऱ्यांच्या मते, गावातील लोकसंख्या आणि जारी केलेल्या प्रमाणपत्रांच्या संख्येत मोठा फरक आहे. सरकारी माहितीनुसार, केवळ ३ महिन्यांत गावात २७३९८ विलंबित जन्म नोंदणी (उशिरा नोंदणीकृत जन्म प्रमाणपत्रे) नोंदवली गेली. हा आकडा सामान्य लोकसंख्याशास्त्रीय स्थितीपेक्षा पूर्णपणे वेगळा आहे.अधिकाऱ्यांच्या मते, यामुळे




डिजिटल नोंदणी प्रणालीचा गैरवापर आणि फसवणुकीची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी यवतमाळ एसडीओपींनी केली होती. त्यानंतर गृह विभागाने तपास एसआयटीकडे सोपवला आहे. महाराष्ट्र सायबर एडीजी याचे नेतृत्व करत आहेत.

या पथकात आरोग्य सेवांचे उपसंचालक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांचाही समावेश आहे. पोलिसांनी इछड आणि आयटी कायद्याच्या कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

# अकोटमध्ये भाजप-MIM आघाडी

## राजकारणाची नवी व्याख्या; सत्तेसाठी सर्व काही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अकोट-** अकोट नगरपालिकेतील सत्तास्थापनेची गणिते पाहता भाजपला बहुमत मिळालेले नाही. ३५ सदस्यांच्या नगरपालिकेत सध्या ३३ जागांची निवडणूक झाली असून भाजपला केवळ ११ जागांवर समाधान मानावे लागले आहे. तरीही भाजपच्या माया धुळे या नगराध्यक्षपदी विजयी झाल्या. मात्र, बहुमताअभावी सत्तेचा डोलारा उभा करण्यासाठी भाजपने 'अकोट विकास मंच' या नव्या आघाडीची स्थापना केली आहे. या मंचात सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे भाजपनंतर सर्वाधिक पाच नगरसेवक असलेल्या एमआयएमचा थेट समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अकोटमध्ये भाजप आणि एमआयएम यांच्यातील आघाडीने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.




या 'अकोट विकास मंचा'त भाजपसोबत ठाकरेंची शिवसेना, शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, बच्चू कडूंचा प्रहार जनशक्ती पक्ष आणि एमआयएम हे सर्व पक्ष एकत्र आले आहेत. या नव्या आघाडीची अधिकृत नोंदणी अकोला जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. या आघाडीच्या माध्यमातून सध्या ३३ सदस्यांपैकी २५ नगरसेवक भाजपच्या नेतृत्वाखाली एकत्र आले असून नगराध्यक्षा माया धुळे या २६ व्या सदस्य ठरतात. उर्वरित काँग्रेसचे सहा आणि वंचित बहुजन आघाडीचे दोन नगरसेवक विरोधी बाकावर बसणार आहेत.

या आघाडीची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे भाजपने या सर्व पक्षांच्या नगरसेवकांवर थेट 'व्हिप' लागू केला आहे. भाजपचे नगरसेवक रवि ठाकूर हे या आघाडीचे गटनेते असतील आणि आघाडीतील सर्वच पक्षांच्या नगरसेवकांना भाजपचा व्हिप पाळावा लागणार आहे. १३ जानेवारी रोजी होणाऱ्या उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यांच्या निवडीत ही आघाडी एकत्रितपणे मतदान करणार आहे. यामुळे अकोट नगरपालिकेतील सत्तेची सूत्रे पूर्णतः भाजपच्या हातात राहणार असल्याचे स्पष्ट होते.

अकोटमधील या आघाडीवरून विरोधकांनी भाजपवर दुहेरी भूमिकेचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे, नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपच्या माया धुळे यांनी एमआयएमच्या फिरोजाबी सिकंदर राणा यांचा ५२७१ मतांनी पराभव केला होता. विधानसभेच्या प्रचारात 'बटेंगे तो कटेंगे'सारखे आक्रमक नारे देणाऱ्या भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थेत मात्र त्याच एमआयएमसोबत सत्ता स्थापन केल्याने भाजप आपल्या भूमिकेचे समर्थन कसे करणार, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# 'तर्री पोहा विथ देवा भाऊ'तून मुख्यमंत्र्यांचे डॅमेज कंट्रोल

## नागपुरात विशेष कार्यक्रमाद्वारे प्रचाराचा धुरळा उडवणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ नागपूर -** नागपूर येथे येत्या गुरुवारी, ८ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रकट मुलाखत होणार आहे. 'तर्री पोहा विथ देवा भाऊ' या विशेष संकल्पनेतून मुख्यमंत्री नागपूरच्या विकासासंदर्भात भाजपचे आणि स्वतःचे व्हिजन मांडणार आहेत. या कार्यक्रमात नागपुरातील विविध क्षेत्रांतील प्रभावशाली व्यक्तींना आमंत्रित करण्यात आले आहे.

या प्रकट मुलाखतीनंतर मुख्यमंत्री नागपूरकर जनतेसोबत 'तर्री पोह्या'चा आस्वाद घेतील. यावेळी 'देवाभाऊ' जनतेच्या काही प्रश्नांची उत्तरेही देणार आहेत. मुलाखत घेणाऱ्यांमध्ये एक वैदर्भीय कलाकार असल्याची माहिती आहे.

८ जानेवारी रोजी होणारी मुख्यमंत्र्यांची ही मुलाखत प्रकट आणि थेट (लाईव्ह) स्वरूपात असेल. भाजपद्वारे शहरातील ५० मोठ्या चौकांत पडदे लावून हजारो नागपूरकरांना ही मुलाखत थेट दाखवण्याची व्यवस्था केली जात आहे. याशिवाय, प्रचाराच्या शेवटच्या दिवशी,



१३ जानेवारी रोजी, मुख्यमंत्र्यांचा एक खास रोड शो नागपुरात आयोजित करण्यात आला आहे, जो मध्य नागपुरातील भारत माता चौकातून सुरू करण्याचे नियोजन आहे. हा कार्यक्रम मुख्यमंत्र्यांच्या 'डॅमेज कंट्रोल' मोहिमेचा भाग मानला जात आहे. भाजपने केलेल्या अंतर्गत सर्वेक्षणांच्या आधारावर ५१ माजी नगरसेवकांची तिकिटे कापण्यात आली होती. यामुळे नाराज झालेले अनेक माजी नगरसेवक पक्षाच्या उमेदवारांविरोधात छुपी मोहीम राबवत असल्याची माहिती आहे.

या नाराजीमुळे किमान २५ जागांवर फटका बसू शकतो, असा अहवाल मिळाल्याने मुख्यमंत्री फडणवीस स्वतः डॅमेज कंट्रोलसाठी पुढे आले आहेत. पदाधिकाऱ्यांनी केलेली मनधरणी यशस्वी ठरली नाही. नागपूर हा भाजपचा बालेकिल्ला असून, मागील २० वर्षांपासूनची सत्ता कायम राखत यावेळी १२० जागांचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री नाराज कार्यकर्त्यांची समजूत घालणार आहेत.

काँग्रेसमधून ऐनवेळी पक्षात आलेल्या तिघांना उमेदवारी देण्यात आली, तर अनेक प्रभागात बाहेरील लोकांना उमेदवारी मिळाल्याने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. या सर्व मुद्द्यांवर मुख्यमंत्री या कार्यक्रमातून तोडगा काढण्याचा प्रयत्न करतील.

# इंस्टावर ग्रामवर घातक शस्त्रासहदहशत पसरविण्याचा व्हिडीओ व्हायरल करणाऱ्या इसमास अटक

## गुन्हे शाखेची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती -** गुन्हे शाखा अमरावती शहर यांना एक इसम हा इंस्टाग्राम वर चाकु सारखे घातक शस्त्र हातामध्ये घेवुन त्याचा व्हि.डी.ओ व्हायरल करून समाजात दहशत निर्माण करीत असल्याची माहीती प्राप्त झाली त्या वरून सदर इसमाची ओळख पटवुन त्यास आज दिनांक ०६.०१.२०२६ रोजी पो.नि.श्री. संदीप चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथील पथकाने आरोपी नामे शेख चांद शेख रहीम वय २० वर्ष रा. इमाम नगर लालखडी अमरावती



यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन व्हिडीओ मध्ये वापरलेला एक लोखंडी चाकु जप्त करून पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथे कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेची धडक कारवाई

# देशी कट्टा व जिवंत काडतूसासह सराईत गुन्हेगार ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती -** अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाजकंटकांवर प्रभावी कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिले आहेत. त्यानुसार गुन्हे शाखा अमरावती शहरचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली घातक शस्त्रांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन बडनेरा हद्दीतील बगिया टी पॉइंट परिसरात कारवाई करण्यात आली. कंबरेला अग्नीशस्त्र बाळगून उभा असलेला नावेद प्रतिक उर्फ पढ्या विनोद कैथवास (वय २०, रा. माताफैल, जुनीवस्ती, बडनेरा, अमरावती) यास गुन्हे शाखेच्या पथकाने मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.आरोपीकडून एक देशी कट्टा (पिस्टल) व एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही अमरावती पोलीस आयुक्तालयात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणी पोलीस स्टेशन बडनेरा येथे आरोपीविरुद्ध आर्म क्ट कलम ३/२५ तसेच मपोका कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.-

# महावितरणचे फ्रेंचायझी मॉडेल आधीही फेल तरीही १३ मंडळांत खासगीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नागपूर-**

महावितरणने अनेक वर्षांपूर्वी नागपूर तसेच तत्कालीन औरंगाबाद (आताचे छत्रपती संभाजीनगर) आणि इतर काही भागांमध्ये वीज वितरणाची फ्रेंचायझी खासगी कंपन्यांना दिली होती. मात्र, या कंपन्यांनी करारातील वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच काम सोडून पळ काढला. इतर राज्यांमध्येही हा फ्रेंचायझी मॉडेल पूर्णपणे अपयशी ठरला आहे. असे असतानाही महावितरणने राज्यातील १३ मंडळांतील (सर्कल्स) वीज वितरणाची जबाबदारी खासगी भांडवलशाही कंपन्यांना देत खासगीकरणाचा घाट घातला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीज क्षेत्राचे खासगीकरण न करण्याबाबत दिलेले आश्वासन फोल ठरल्याचा आरोप महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने केला आहे.

फ्रेंचायझी मॉडेल महाराष्ट्राच्या वीज वितरण क्षेत्रात पूर्णतः अपयशी ठरले आहे. असे असतानाही खासगी भांडवलदार व कॉर्पोरेट कंपन्यांच्या हितासाठी फ्रेंचायझी कंपन्यांद्वारे खासगीकरणाचा प्रयोग करण्याचा हट्ट सुरू आहे. यापूर्वी राज्यातील तत्कालीन औरंगाबाद (आताचे छत्रपती संभाजीनगर), नागपूर आणि जळगाव येथील फ्रेंचायझी कंपन्या कराराची मुदत पूर्ण होण्यापूर्वीच पळून गेल्याची




उदाहरणे आहेत. देशपातळीवरही ओडिशा आणि उत्तर प्रदेशमध्ये फ्रेंचायझी कंपन्या अपयशी ठरल्या होत्या. त्यानंतरही नव्याने महावितरणने फ्रेंचायझीच्या नावाखाली राज्यातील १३ मंडळांतील वीज वितरणाचे काम खासगी भांडवलदारांना देणे चुकीचे असल्याचे महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे अध्यक्ष मोहन शर्मा यांनी सांगितले.

महावितरण शेतकरी, आदिवासी, दारिद्र्यरेषेखालील वर्ग, पावरलूम तसेच इतर वीज ग्राहकांना सामाजिक उत्तरदायित्व निभावत सवलतीच्या दराने वीज पुरवठा करते. विविध ग्राहकांकडील थकबाकी वसूल करताना होणारा राजकीय हस्तक्षेप, निवडक उद्योगांना दिलेली सवलतीची वीज आणि माफी असूनही महावितरण कंपनी ४७८ कोटी रुपये, महापारेषण कंपनी १,५०० कोटी रुपये तर महानिर्मिती कंपनी १०० कोटी रुपयांच्या नफ्यात आहे. त्यामुळे नफ्यात असलेल्या या कंपन्यांमध्ये खासगीकरणाची प्रक्रिया कुणाच्या फायद्यासाठी राबवली जात आहे, असा सवाल महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे अध्यक्ष मोहन शर्मा आणि सरचिटणीस कृष्णा भोयर यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, फ्रेंचायझीला कामगार संघटनांचा तीव्र विरोध असल्याने महावितरण, राज्य सरकार आणि विविध कामगार संघटनांमध्ये फ्रेंचायझीच्या मुद्द्यावर संघर्ष उभा राहण्याचे संकेत मिळत आहेत.

# अखेर रतन इंडिया व्यवस्थापन उपोषणकर्त्यांपुढे झुकले

## ७३ कामगारांच्या खात्यात तात्काळ २८ लाख रुपये जमा : आ. राजेश वानखडे यांच्या पुढाकाराने विवेक गुल्हाने यांचे उपोषण सुटले

मंगेश तायडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नांदगाव पेठ**

भाजप नेते विवेक गुल्हाने यांनी सहकाऱ्यांसह सुरू केलेल्या आमरण उपोषणामुळे रतन इंडिया ऊर्जा प्रकल्प व्यवस्थापनाला अखेर माघार घ्यावी लागली. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या उपोषणाने मंगळवारी निर्णायक वळण घेतले. कामगार व कार्यकर्ते आक्रमक झाल्यानंतर व्यवस्थापनावर दबाव वाढत गेला आणि मंगळवारी सायंकाळी ७३ कामगारांच्या खात्यात तब्बल २८ लाख रुपये ग्रॅज्युइटी व कपात केलेली रक्कम जमा करण्यात आली. दिल्ली मॅनेजमेंट फॅसिलिटी कंपनीने तात्काळ रक्कम अदा केली, तर उर्वरित मागण्यांबाबत रात्री दहा वाजता लेखी रतन इंडिया व्यवस्थापनाच्या वतीने आश्वासन देण्यात आले. या आंदोलनादरम्यान रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाच्या इतिहासात प्रथमच कार्यकर्त्यांकडून चारही प्रवेशद्वार बंद करण्यात आली होती, तसेच कोळसा वाहतूक करणारी रेल्वे दिवसभर रोखण्यात आली, यामुळे कंपनीला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. 'हम करे सो कायदा'च्या भूमिकेत



वावरणारे व्यवस्थापन गुल्हाने यांच्या ठाम उपोषणामुळे पुरते हतबल झाले होते. आमदार राजेश वानखडे सकाळपासून उपोषण स्थळी ठिय्या मांडून बसले होते. आमदारांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासन व रतन इंडिया व्यवस्थापनाशी थेट चर्चा केल्यानंतर अखेर रात्री दहाच्या सुमारास तोडगा निघाला. प्रकल्प प्रमुख पगलापती यांनी आमदार राजेश वानखडे यांना दिलेल्या लेखी पत्रात राखेमुळे झालेल्या शेती नुकसानीबाबत शासन नियमांनुसार व संबंधित यंत्रणांच्या अहवालातील तांत्रिक त्रुटी दूर करून कार्यवाही केली जाईल, प्रकल्पग्रस्त युवकांच्या रोजगाराबाबत शासन धोरणांनुसार व उपलब्ध पदांच्या अनुषंगाने निर्णय घेतला जाईल, प्रकल्पग्रस्त कामगारांच्या वेतनवाढीचा विषय कंपनीच्या अंतर्गत धोरणांनुसार व कामगिरीच्या आधारावर दरवर्षी विचारात घेतला जाईल, तसेच वाघोली गावातील राख प्रदूषणाबाबत सातत्याने नियंत्रण उपाययोजना राबविल्या जातील, अशी स्पष्ट हमी देण्यात आली आहे. यासोबतच जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित विभागांसोबत बैठक घेऊन झालेल्या चर्चेनुसार १५ दिवसांत केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात येईल, असेही नमूद करण्यात आले आहे. लेखी आश्वासन मिळताच आ. राजेश वानखडे यांनी विवेक गुल्हाने व सहकाऱ्यांना ज्यूस पाजून त्यांचे उपोषण सोडविले. कामगारांना त्यांच्या कष्टाचे पैसे तात्काळ मिळाल्याने कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कामगारांनी उपोषणकर्ते विवेक गुल्हाने व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानत लढ्याचा विजय साजरा केला.यावेळी विवेक गुल्हाने यांचे सह मनीषा गुल्हाने, वीरेंद्र लंगडे, मोनिका पिहुलकर, भारती गेडाम, रेखा गिरी, नागेंद्र तायडे, आकाश गुल्हाने, नितीन काळे, विजय भुयार, सागर खराटे, विजय झटाले, अनिल खंडारे, राजेंद्र तुळे,नरेश गेडाम, संजय खंडारे, गौरव मनोहर, अनिकेत बीजवे, भैया वासनिक, राजेश चौधरी, सिद्धार्थ नाईक, मंगेश खाडे, महेंद्र पानेकर, अंकुश कांबळे, अनिल भगत, राजू खाडे, संदीप तुरे, आनंद मनोहर, विलास इंगोले, किशोर खंडारे, उमेश शेंडे, समाधान तुरे, केशव सायखेडे, बबन बैले, शरद धर्माळे, मनोहर मोहिते, अतुल देशमुख, प्रतीक खाडे, विनोद टेकाडे, राजेश मोहोड, गौरव मनोहर,शेख सलाम, सचिन हटवार, मनोज यावले, सुधीर जाधव,हिराराल मोहिते, राजू खुरसुळे, अजय ठाकरे, संजय नागोणे,विनोद वासनकार, प्रशांत वैद्य, नयन लंगडे, भूषण राठोड, चेतन पाटील, अक्षय कल्हाने, रवींद्र लंगडे, सागर होले उपस्थित होते.

**संघर्ष सुरुच राहणार विवेक गुल्हाने**

हा लढा राजकारणाचा नव्हता, तर कामगारांच्या कष्टाच्या पैशासाठी होता. उपोषणात शरीर थकले, पण अन्यायाविरुद्धची जिद्द तुटली नाही. आज ७३ कामगारांना न्याय मिळाला, हा माझा नव्हे तर कामगारांच्या एकजुटीचा विजय आहे. आमदार राजेश वानखडे यांची खंबीर साथ असल्यामुळे हा तोडगा निघाला. कामगारांचे हक्क, रोजगार आणि न्याय मिळेपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही अशी प्रतिक्रिया उपोषणकर्ते भाजप नेते विवेक गुल्हाने यांनी दिली.

# जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभाग आर्थिक संकटात; कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**




जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागाची आर्थिक स्थिती सध्या अत्यंत गंभीर बनली असून, या विभागाचा कारभार अक्षरशः निधीअभावी ठप्प झाला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक खर्च, प्रशासकीय दैनंदिन बाबींसाठीचा निधी तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन यासाठी एकही रुपया उपलब्ध नसल्याची धक्कादायक परिस्थिती समोर आली आहे. शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात मोठी कपात करण्यात आल्याने विभाग अडचणीत सापडला आहे.पाणी व स्वच्छतेसारख्या अत्यावश्यक सेवांशी संबंधित असलेल्या या विभागाकडे सध्या प्रशासकीय खर्चासाठी निधी नसल्याने कार्यालयीन कामकाजावर गंभीर परिणाम झाला आहे. साध्या किरकोळ खर्चासाठीही पैसे उपलब्ध नसल्याने फाईल कामकाज, दैनंदिन गरजा आणि नियोजन प्रक्रियेत मोठे अडथळे निर्माण झाले आहेत. इतकेच नव्हे तर विभागाला पाणीपुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराचे केवळ १८ हजार रुपयांचे बिल गेल्या तीन वर्षांपासून थकीत आहे. ही रक्कम अदा करण्यासाठीही विभागाकडे निधी शिल्लक नाही, ही बाब प्रशासनाच्या उदासीनतेचे प्रतीक मानली जात आहे.याशिवाय विभागाचे वीज बिलही थकीत राहिल्याने वीजपुरवठा खंडित होण्याची नामुष्की ओढवली होती. अखेर जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मध्यस्थीने हस्तक्षेप करत वीज बिलाचा भरणा केला. त्यामुळे ऐनवेळी वीज तोडणी टळली असली तरी विभागावरील आर्थिक ओझे अधिकच वाढले आहे.या विभागात मुख्यालय तसेच तालुकास्तरावर कार्यरत असलेल्या सुमारे ३२ कर्मचाऱ्यांचे चार महिन्यांपासून वेतन थकीत आहे. वेतन नसल्याने कर्मचारी आर्थिक अडचणीत सापडले असून, त्यांच्यात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. स्वच्छ भारत मिशनसारख्या केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या विभागाची अशी अवस्था झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.शासनाला नेमके पाणी व स्वच्छता विभागाचे काय करायचे आहे? असा सवाल आता उघडपणे उपस्थित केला जात आहे. निधीअभावी अधिकारी आणि कर्मचारी संभ्रमात असून, विभागाच्या भवितव्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. पाणीपुरवठा आणि स्वच्छता या मूलभूत सेवांवर याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे शासनाने तातडीने लक्ष घालून या विभागाला पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.

# मुद्रित माध्यमांचे महत्त्व अबाधित

## पोलिस आयुक्त राकेश ओला यांचे प्रतिपादन
## श्रमिक पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

वेगवेगळी माध्यमे उदयास आली आहे, पण मुद्रित माध्यमांचे महत्त्व अबाधित आहे. बरेचदा आम्हाला आमच्या गोपनीय यंत्रणेच्याही आधी पत्रकारांकडून माहिती मिळते. पत्रकारांचे हे जाळे फार महत्त्वाचे आहे, या शब्दात पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित केले.

अमरावती श्रमिक पत्रकार संघातर्फे मंगळवारी दुपारी आयोजित पत्रकार दिन व पुरस्कार वितरण सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. तत्पूर्वी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला मनपा आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, ज्येष्ठ पत्रकार ॲड. दिलीप एडतकर, विलास मराठे, प्रवीण आहुजा, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, श्रमिक पत्रकारांच्या पुरस्कार निवड समितीचे समन्वयक डॉ. विलास नांदुरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मनपा आयुक्त सौम्या शर्मा म्हणाल्या, मराठी पत्रकारितेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. या पत्रकारितेचा व्याप दिवसेंदिवस वाढतो आहे. आगामी मनपा निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. याप्रसंगी उपस्थित उपरोक्त अन्य मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.अमरावती श्रमिक पत्रकार संघाचा यदाच्या जीवनगौरव पुरस्काराने ज्येष्ठ पत्रकार मनोहर परिमल यांना उपस्थित मान्यवरांच्याहस्ते सन्मानितकरण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप ३१ हजार रोख, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे आहे. पत्रमहर्षी बाळासाहेब मराठे व डॉ. अरुण मराठे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रभावी पत्रकारिता पुरस्कार, स्वप्नील उमप, ममता एडतकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, प्रवीण कपिले, दर्पणकार अनिल कुचे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शोध पत्रकारिता पुरस्कार प्रदीप भाकरे, तर तख्तगढ राजस्थान येथील स्व. सुमतीदेवी व स्व. डॉ. सोहनमल जैन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उद्योजक (कोल्हापूर) सुरेंद्र जैन प्रायोजित लक्षवेधी पत्रकारिता पुरस्कार योगिनी अर्डक यांना देऊन सन्मानित करण्यात आले. प्रत्येकी ११ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. याशिवाय राज्य शासनातर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या लोकनायक बापूजी अणे पुरस्कारासाठी गजानन मोहोड व अनुप गाढवे यांची निवडझाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. पुरस्कारार्थीतर्फे मनोहर परिमल व स्वप्नील उमप यांनी भावना व्यक्त केल्या. प्रास्ताविक पत्रकार संघाचे उपाध्यक्ष मोहन अटाळकर, संचालन कार्यकारिणी सदस्य शैलेश धुंदी यांनी केले.पुरस्काराबद्दलची मांडणी संघाचे कोषाध्यक्ष गिरीश शेरेकर आणि आभार सचिव रवींद्र लाखोडे यांनी मानले. पाहुण्यांचे स्वागत संघाचे उपाध्यक्ष अमोल इंगोले, कृष्णा लोखंडे, संतोष ताकपिरे, महेश कथलकर, भैय्या आवारे, वैभव बाबरेकर यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.

# मारडा येथे सार्वजनिक अभ्यासिकेचा लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मारडा (ता. तिवसा)**

शहरी भागाच्या पार्श्वभूमीवर आपल्या ग्रामीण गावामध्ये सुद्धा गावातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सुसज्य , शांततापूरक वातावरण, संदर्भग्रंथ, वाय-फाय युक्त अभ्यासिका असावी या भावनेतून गावातील युवकांनी पुढाकार घेऊन लोक वर्गणी करून आपल्या गावामध्ये अभ्यासिका उभारली. गावामध्ये सुद्धा भरगोस प्रतिसाद लाभला .त्यामुळे गावातील स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यामधे उत्साहाचे वातावरण आहे. या सार्वजनिक अभ्यासिकेचा लोकार्पण सोहळा क्रांतीज्योती माता सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच रवीना ताई अंबूरे या होत्या. तर उद्धाटक म्हणून श्री सुनीलराव आखरे, माजी प्राचार्य, यांनी उपस्थितांना गावातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून कसे पुढे जाईल याविषयी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री धर्मेंद्र कुरळकर सर उपस्थित होते. तसेच अतिथी म्हणून श्री पंढरीनाथ जिरापुरे, श्री सुरेशराव धवणे व श्री वसंतराव आखरे श्री प्रदिपभाऊ सोळंके यांनी आपली उपस्थिती दर्शवून अभ्यासिकेस शुभेच्छा दिल्या.ही सार्वजनिक अभ्यासिका साकारण्यासाठी श्री विनोदराव जिरापुरे , अमोलभाऊ आसोले, आकाश धवणे, सुरज खैरकार,पुष्पक गुल्हाने, कार्तिक बळकस, रोहित पाटील ,वसीम शहा, प्रफुल गायकवाड तसेच मित्रमंडळी यांनी अथक परिश्रम घेतले.तसेच मारडा ग्रामपंचायत ने सुद्धा विशेष सहकार्य केले. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय तालनकर यांनी केले, आभार प्रदर्शन अनिकेत बडकस यांनी केले. या लोकार्पण सोहळ्यास गावातील नागरिक, युवक व विद्यार्थी वर्गाची भरघोस उपस्थिती लाभली.

# चिचखेडा शेतशिवारात वाघाचा हैदोस

## दोन दिवसांत दोन गाई व एक गोऱ्हा ठार; शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७चिखलदरा**

तालुक्यातील चिचखेडा शेतशिवारात वाघाने धुमाकूळ घातल्याची घटना समोर आली असून, अवघ्या दोन दिवसांत दोन गाई व एका गोऱ्ह्याची शिकार झाल्याने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वाघाच्या हल्ल्यात मारोती दसरू पारधे यांचा गोऱ्हा, परशराम येवले (जामली) यांची एक गाय, तसेच पारधे कुटुंबाची एक गाय ठार झाली आहे. शेतशिवारात जनावरे चारण्यासाठी गेलेल्या नागरिकांना मृत जनावरे आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. घटनास्थळी वाघाच्या पावलांचे ठसे स्पष्टपणे दिसून येत असून, वनविभागाच्या गस्तीअभावी वाघ मोकाटपणे फिरत असल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांकडून होत आहे. याभागात आधीच वन्यप्राण्यांचा वावर मोठ्याप्रमाणात असून, आता वाघाच्या सलग हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे कठीण झाले आहे. जनावरे बांधून ठेवावी लागत आहेत. त्यामुळे रात्री भीतीचे वातावरण पसरले आहे.घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली असून, तत्काळ पंचनामा करूननुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, तसेच वाघाचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वनविभागाने तातडीने गस्त वाढवावी, पिंजरा लावावा किंवा वाघाचा हालचालींवर लक्ष ठेवावे, अन्यथा मनुष्यहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

# चौदाही तालुक्यांमध्ये बारामाही शेत रस्ते तयार होणार

## अहिल्यादेवी होळकर समृद्धी शेत पांदण रस्ते, जल पुनर्भरण योजनेची अंमलबजावणी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**



जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या दळणवळणाची समस्या सोडविण्यासाठी आणि पाणीसाठा वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. संपूर्ण जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समृद्धी शेत पांदण रस्ते व जल पुनर्भरण योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये बारामाही शेत रस्ते तयार करण्यात येणार असून, यासाठी स्थानिक नदी व नाल्यांमधील गाळ व साहित्याचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे जलस्त्रोतांचे खोलीकरण होऊन पाणी पातळी वाढण्यास मदत होणार आहे.

ही योजना लोकसहभाग आणि शासकीय निधीच्या संयुक्त विद्यमाने राबविली जाणार आहे. योजनेसाठी प्रतिकिलोमीटर ९ लाख रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला असून, त्यापैकी ७.५ लाख रुपये शासन देणार आहे. तर उर्वरित १.५ लाख रुपये संबंधित अशासकीय संस्थेला लोकसहभागातून उभे करावे लागणार आहेत. या कामासाठी रस्ते बांधणीचा अनुभव असलेल्या सेवाभावी संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. निवड झालेल्या संस्थांसोबत जिल्हाधिकारी कार्यालय सामंजस्य करार करणार आहे. या योजनेमुळे शेत रस्त्यांवरील अतिक्रमणे दूर होऊन शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेपर्यंत नेणे अधिक सुलभ होईल, असे उपजिल्हाधिकारी रोहयो यांनी कळविले आहे.

# १५ जानेवारीला मतदान

# उद्या EVM प्रात्यक्षिक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. अमरावती महानगरपालिकेत बहुसदस्यीय प्रभाग पद्धत लागू असल्याने प्रत्येक मतदारास अ, ब, क, ड अशा चार जागांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण चार वेळा मतदान करावे लागणार आहे. मात्र प्रभाग क्रमांक ९ वडाळी-एस.आर.पी.एफ. येथे अ, ब, क या तीन जागांसाठी तीन वेळा मतदान करण्यात येणार आहे.मतदान प्रक्रियेबाबत तसेच मतदान यंत्र वापराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी बुधवार, दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, अमरावती महानगरपालिका येथे एतच् प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रात्यक्षिकास सर्व माध्यम प्रतिनिधी तसेच इच्छुक नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे मतदारांना मतदान प्रक्रियेची सविस्तर माहिती मिळून योग्य जनजागृती होण्यास मदत होणार आहे.




# मी प्रचारात उतरले असते तर दहा हजार मतांनी पराभव निश्चित

## सुलभा खोडकेंवर नवनीत राणांचा जोरदार हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत चालले असून राणा दाम्पत्य आक्रमक प्रचाराच्या मैदानात उतरले आहे. या पार्श्वभूमीवर माजी खासदार व भाजप नेत्या नवनीत राणा यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या आमदार सुलभा खोडके यांच्यावर तीव्र शब्दांत टीका करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.नवनीत राणा यांनी जाहीर सभेत बोलताना आमदार सुलभा खोडके यांच्यावर थेट निशाणा साधला. मी अमरावती शहरात विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी फिरले नाही, याबद्दल



त्यांनी माझे आभार मानले पाहिजेत. जर मी प्रचारात उतरले असते आणि केवळ दोन सभा घेतल्या असत्या, तर त्या दोन हजार मतांनीही निवडून आल्या नसत्या. उलट दहा हजार मतांनी त्यांचा पराभव झाला असता, असा दावा नवनीत राणा यांनी केला.यावेळी बोलताना नवनीत राणा अधिक आक्रमक झाल्या. मला इमानदारी शिकवण्याची आमदार सुलभा खोडके यांना काहीच गरज नाही. जनतेने कोणाला कशासाठी निवडून दिले आहे, हे सर्वांना माहिती आहे, असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे आमदार खोडके यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.तसेच विधानसभा निवडणुकीचा संदर्भ देत नवनीत राणा म्हणाल्या, त्या निवडणुकीत त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटोसुद्धा चालला नाही. मोदींच्या नावावर मते मिळत नसतील, तर जनतेचा विश्वास कुठे आहे, हे त्यांनी आधी तपासावे. याचवेळी या भगव्यामध्ये त्यांचा पराभव करण्याची ताकद आहे, असा जोरदार टोला त्यांनी लगावला.राणा दाम्पत्य सध्या अमरावतीत महापालिका निवडणुकीच्या प्रचारात सक्रिय असून सभांमधून आणि प्रचार दौर्यांतून विरोधकांवर थेट हल्ले चढवत आहेत. नवनीत राणा यांच्या या वक्तव्यामुळे भाजप समर्थकांमध्ये उत्साह संचारला असून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या गोटात मात्र अस्वस्थता निर्माण झाली आहे.दरम्यान, नवनीत राणा यांच्या या टीकेनंतर राष्ट्रवादीकडूनही प्रत्युत्तर दिले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत अमरावतीच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांची धार अधिक तीव्र होण्याचे संकेत आहेत. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेत्यांच्या अशा आक्रमक वक्तव्यांमुळे प्रचाराची रंगत वाढली असून, मतदारांचे लक्ष वेधण्यासाठी राजकीय संघर्ष आणखी तीव्र होणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

# राणा दाम्पत्याचे दुटप्पी धोरण उघड

## नवनीत राणांवर सुलभा खोडकेंचा जोरदार पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

माजी खासदार नवनीत राणा यांच्या वक्तव्यावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नेत्या व आमदार सुलभा खोडके यांनी तीव्र प्रतिक्रिया देत राणा दाम्पत्यावर थेट आरोप केले आहेत. पक्षाचं नाव वेगळं आणि काम वेगळंच सुरू आहे. माजी खासदार नवनीत राणा यांनी अशा प्रकारचं बोलणं शोभत नाही, असा स्पष्ट टोला खोडके यांनी लगावला.नवनीत राणा सातत्याने टीका करत असतील, तर त्यात काहीही अर्थ नाही, असे सांगत सुलभा खोडके म्हणाल्या की, मागच्या गोष्टी उकरून काढण्यात काही अर्थ नाही. महत्त्वाचं म्हणजे सध्या नेमकं कोण कुठल्या पक्षात आहे, हेच जनतेला कळत नाही. त्यांनी थेट प्रश्न उपस्थित करत म्हटले, नवनीत राणा आतापर्यंत नेमक्या कुठल्या पक्षात आहेत?राणा दाम्पत्याच्या भूमिकेवर बोट ठेवत खोडके म्हणाल्या की, एका कुटुंबात



दोन व्यक्ती दोन वेगवेगळ्या पक्षांत काम करत आहेत. राणा दाम्पत्य दोन वेगवेगळ्या राजकीय पक्षांत सक्रिय आहे. नवरा युवा स्वाभिमान संघटनेत काम करतो, तर बायको भाजपमध्ये आहे. हा कोणता राजकीय स्पष्टपणा आहे?भाजपमधील भूमिकेवरही त्यांनी टीका केली. भाजपमध्ये मुख्यमंत्री यांच्या बाजूला बसून काम करता आणि त्यानंतर पुन्हा नवऱ्याच्या पक्षाचा प्रचार करायला बाहेर पडता. हे सरळसरळ दुटप्पी धोरण आहे, असा गंभीर आरोप सुलभा खोडके यांनी केला.विधानसभा निवडणुकीच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी स्पष्ट भूमिका मांडली. मला विधानसभेत पराभूत करायचं होतं, तर मैदान मोकळं होतं. तेव्हाच प्रयत्न करता आले असते, असे म्हणत त्यांनी विरोधकांना आव्हान दिले. पुढे त्या म्हणाल्या, मला पाडायचं की मला जिंकवून आणायचं, हे आता २०२९ मध्ये पाहू.सुलभा खोडके यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे अमरावतीच्या राजकारणात नव्या चर्चेला उधाण आले असून, राणा दाम्पत्य आणि राष्ट्रवादी यांच्यातील वाद आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# महाराष्ट्रात कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा; सत्ताधाऱ्यांकडून लोकशाहीचा गळा घोटला जातोय - हर्षवर्धन सपकाळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अमरावती येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत राज्यातील सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीकास्त्र सोडले. काँग्रेस नेते हिदायत पटेल यांच्या हत्येचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळलेली आहे. राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री नसल्यामुळेच असे गंभीर गुन्हे घडत आहेत. अकोला हत्येतील आरोपींना तात्काळ अटक करावी आणि महाराष्ट्राला पूर्णवेळ गृहमंत्री मिळावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली.सपकाळ म्हणाले की, अमरावती शहरात प्रशासक काळात लॅन्ड माफियांचा सुळसुळाट झाला असून, शहराची कायदा-सुव्यवस्था बिघडली आहे. गुन्हेगारी वाढली असून, सामान्य नागरिक असुरक्षित बनला आहे. विदर्भाच्या विकासावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, नागपूरचा विकास म्हणजे संपूर्ण विदर्भाचा विकास नव्हे. वस्तुस्थिती अशी आहे की, नागपूरचाही




अपेक्षित विकास झालेला नाही. अमरावतीसह संपूर्ण विदर्भाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे.निवडणूक प्रक्रियेवर गंभीर आरोप करत सपकाळ म्हणाले की, महाराष्ट्रात सत्ताधाऱ्यांकडून पैसा फेक तमाशा सुरू आहे. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातातील खेळणं बनलं आहे. मतदानाच्या आधी आणि मतदानाच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पैसे वाटप झाले. मनपा निवडणुकांमध्येही असाच प्रकार घडल्याचा आरोप त्यांनी केला. सत्ताधारी पक्ष महाराष्ट्राच्या लोकशाहीचा गळा घोटत आहेत, असा घणाघात त्यांनी केला.राज्याच्या नेतृत्वावर टीका करताना सपकाळ यांनी दोनही उपमुख्यमंत्री गुंड असल्याचा आरोप केला. ईव्हीएम मशीनवर नोटा ठेवल्यामुळे बिनविरोध जागा होत असल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला. विधानसभेच्या अध्यक्षांवरही त्यांनी आरोप करत, स्वतःचा भाऊ, भावजय आणि बहीण बिनविरोध निवडून यावेत यासाठी दबाव आणला जातो, असे सांगितले.अंबरनाथच्या राजकारणावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, अंबरनाथमध्ये काँग्रेसचे १२ उमेदवार निवडून आले असून, आम्ही कुणालाही पाठिंबा दिलेला नाही. काँग्रेसचा भाजपशी कुठलाही संबंध नाही. भाजपला आम्ही पाठिंबा दिलेला नाही आणि देणारही नाही. वंचित बहुजन आघाडीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, मुंबईमध्ये काँग्रेस-वंचित युती आहे. वंचित हा आमचा मित्र पक्ष आहे. मित्र पक्षाने मित्र पक्षावर टीका करू नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रणिती शिंदे यांच्याबाबत वक्तव्य करू नये, असेही त्यांनी नमूद केले.भाजप-एमआयएम संबंधांवर टीका करत सपकाळ म्हणाले, एमआयएम हे भाजपचे 'बी टीम' आहे, हे नांदेड निवडणुकीत सिद्ध झालं आहे. पुढे ते म्हणाले, भाजप मजबूत झाल्याचा कांगावा केला जातो, पण भाजप इतर पक्षांच्या उमेदवारांनाच तिकीट देत आहे.समृद्धी महामार्गावर २ हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप करत त्यांनी श्वेतपत्रिका काढण्याची मागणी केली. महाराष्ट्रात टक्के घेतल्याशिवाय फाईल पुढे जात नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला. देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना ते म्हणाले, ते 'देवा भाऊ' नाहीत, तर 'घेवा भाऊ' आहेत. त्यांची शॉर्ट टर्म मेमरी गेली असून, त्यांना गजनी झाला आहे.भाजप पैसे वाटून निवडणुका लढवत आहे, याचा अर्थ त्यांच्या पायाखालची वाळू घसरली आहे, असा निष्कर्ष काढत सपकाळ म्हणाले की, काँग्रेस-मुक्त भारताच्या नादात भाजपच आता काँग्रेस-युक्त होत चालली आहे. शतप्रतिशत भाजपचा नारा देणारे आता मित्र पक्षांना बाजूला सारत आहेत, असा आरोप करत त्यांनी पत्रकार परिषदेत सत्ताधाऱ्यांवर तोफ डागली.

# सभा होणार कुणाची? मैदान बुकिंगवरून रस्सीखेच

## युवा स्वाभिमान पक्षासाठी सहा दिवस दसरा मैदान राखीव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

आगामी १५ जानेवारीला होणाऱ्या अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील निवडणूक प्रचाराला चांगलाच वेग आला आहे. प्रचाराची सुरुवात आधीच सुपर संडे'च्या माध्यमातून झाली असून, त्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा रोड शो तसेच एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांची अकॅडमिक हायस्कूलच्या मैदानावर सभा पार पडली.

आता १३ जानेवारीपर्यंत विविध पक्षांचे प्रमुख नेते शहरात दाखल होण्याची शक्यता असून, उमेदवारांच्या प्रचारासाठी मोठ्या सभांचे आयोजन केले जात आहे. मात्र, प्रचारादरम्यान प्रतिस्पर्धी पक्षांना सभा घेण्यासाठी मैदान उपलब्ध होऊ नये, या उद्देशाने काही पक्षांकडून सामाजिक किंवा अन्य कार्यक्रमांच्या नावाखाली आधीच मैदान आरक्षित करण्याची रणनीती अवलंबली जात असल्याचे चित्र आहे.सध्या शहरातील प्रमुख मैदानांपैकी फक्त दसरा मैदान आरक्षित करण्यात आले असून, सायन्सकोर मैदान आणि अकॅडमिक मैदान हे ५ ते १३ जानेवारीदरम्यान अद्याप कोणत्याही पक्षाकडून आरक्षित करण्यात आलेले नाहीत.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या अखत्यारित असलेल्या दसरा मैदानाच्या आरक्षणाची जबाबदारीप्रसाद पाटणे यांच्याकडे आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आमदार रवि राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाने एका सामाजिक कार्यक्रमाच्या नावाखाली १० ते १५ जानेवारीदरम्यान दसरा मैदान आरक्षित करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. त्यामुळे १० जानेवारीपासून निवडणूक प्रचार संपेपर्यंत दसरा मैदान इतर कोणत्याही पक्षासाठी उपलब्ध राहणार नाही. दरम्यान, ७ जानेवारी रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेसाठी शिंदे गटाच्या शिवसेनेकडून नेहरू मैदान आरक्षित करण्यात आले आहे. मैदानांच्या अधिकारक्षेत्राबाबत माहिती अशी की, सायन्सकोर मैदान आणि अकॅडमिक मैदान हे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या अखत्यारित येतात. नेहरू मैदान हे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात असून, त्या मैदानासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून एनओसी देण्यात येते. तर अमरावती-बडनेरा मार्गावरील दशहरा मैदान हे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या अखत्यारित आहे.

# जि.प. निवडणुकीची घोषणा पुढील आठवड्यात?

## १२ जिल्हा परिषदांची निवडणूक पहिल्या टप्प्यात

### अमरावती जिल्हा परिषद निवडणूक पहिल्या टप्प्यात नाही




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच पुढील आठवड्यात जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होऊ शकते. आरक्षण ५० टक्क्यांच्या आत असलेल्या १२ जिल्हा परिषदांची निवडणुकीची घोषणा पुढील आठवड्यात अपेक्षित आहे. त्यासाठी सज्ज असल्याचे राज्य निवडणूक आयोगातील सूत्रांनी सांगितले.

राज्यात निवडणूक रखडलेल्या ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्या आहेत. यापैकी २० जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत ८८ पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक आहे. तिथल्या निवडणुका पुढील निर्णयापर्यंत न घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. २१ जानेवारीला सुनावणी आहे.

**पहिल्या टप्प्यात..?**

ज्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे, त्यात पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदांचा समावेश आहे. उर्वरित जिल्हा परिषदांच्या निवडणुका न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार दुसऱ्या टप्प्यात घेण्यात येणार आहेत.राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले असून, त्या पार्श्वभूमीवर या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता असल्याचेही सूत्रांचे म्हणणे आहे.

# अमरावतीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे; नाराज माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांच्यासोबत बंद दरवाजाआड चर्चा - शिवसेनेत पुनर्प्रवेशाची शक्यता?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून, त्यांच्या या दौऱ्याला मोठे राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. अमरावतीत आगमनानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी थेट माजी पालकमंत्री तसेच शिवसेनेचे पश्चिम विदर्भाचे माजी संघटन प्रमुख जगदीश गुप्ता यांच्या सिपना कॉलेज येथे भेट घेतली. या अचानक झालेल्या भेटीमुळे जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.अलिकडेच पक्षांतर्गत नाराजी व्यक्त करत जगदीश गुप्ता यांनी पत्रकार परिषद घेऊन शिवसेना सोडण्याची घोषणा केली होती. संघटनात्मक निर्णयांबाबत तसेच स्थानिक पातळीवरील दुर्लक्षामुळे आपण नाराज असल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते. त्यांच्या या भूमिकेमुळे शिवसेनेला विदर्भात मोठा धक्का बसल्याचे मानले जात होते. अशा परिस्थितीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः अमरावतीत येऊन गुप्ता यांची भेट घेणे, हे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.शिंदे आणि गुप्ता यांच्यात सध्या बंददरवाजाआड चर्चा सुरू असून, या बैठकीतील नेमका अजेंडा अद्याप समोर आलेला नाही. मात्र, ही चर्चा समेटासाठी असून नाराजी दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. विशेष म्हणजे, या बैठकीदरम्यान कोणतेही माध्यम प्रतिनिधी उपस्थित नव्हते, त्यामुळे चर्चेतील मुद्द्यांबाबत गोपनीयता पाळली जात आहे.जगदीश गुप्ता हे विदर्भातील एक प्रभावशाली नेते मानले जातात. अमरावती जिल्ह्यासह पश्चिम विदर्भात त्यांचा मोठा जनसंपर्क आणि संघटनात्मक अनुभव आहे. त्यांच्या निर्णयाचा परिणाम येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर तसेच आगामी राजकीय समीकरणांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे गुप्ता पुन्हा शिवसेनेत परतणार का, की स्वतंत्र राजकीय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, या भेटीमुळे शिवसेनेतील अंतर्गत मतभेद मिटण्याची चिन्हे दिसत असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज नेत्यांना पुन्हा पक्षात सक्रिय करण्याच्या भूमिकेत असल्याचे संकेत मिळत आहेत. या चर्चेनंतर गुप्ता यांची पुढील भूमिका काय असेल, हे लवकरच स्पष्ट होण्याची शक्यता असून, अमरावतीसह संपूर्ण विदर्भाच्या राजकारणात याचे पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.

# सकाळी पदयात्रा, दुपारी बैठका आणि रात्री कोपरासभा; अमरावतीत प्रचाराचे रान तापले

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावती महापालिका निवडणुकीचे रणमैदान तापू लागले असून प्रभागातील जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांनी पायाला भिंगरी बांधली आहे. सकाळी पदयात्रेद्वारे घरोघरी संपर्क, दुपारी गल्ली निहाय बैठका आणि रात्री कोपरा सभा असे हाऊसफुल्ल वेळापत्रक तयार केले आहे.



प्रचारासाठी १२ दिवसांचा अवधी हाती असल्याने उमेदवारांनी नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा राबवली आहे. प्रमुख पक्षांच्या उमेदवारांची तिकिटे लवकर निश्चित झाल्याने त्यांनी आपला प्रभाग पिंजून काढला आहे. तिकिटासाठी रस्सीखेच झालेल्या ठिकाणी मात्र उमेदवारांना मतदारापर्यंत पोहोचण्यात धावपळ करावी लागत असल्याचे दिसत आहे. यंदा प्रभाग रचनेत फारसा बदल झालेला नाही. मिरज आणि कुपवाड शहरांमध्ये जोडून असणाऱ्या प्रभागात मात्र बदल झाले आहेत. त्यामुळे तेथील नव्या मतदारांपर्यंत पोहोचून आपली भूमिका मांडण्यासाठी प्रयत्न करावे लागत आहेत. विस्तारित भागातील प्रभागांमध्ये चारही उमेदवारांनी प्रचाराचे स्वतंत्र नियोजन केले आहे. थोड्या-थोड्या वस्त्या वाटून घेतल्या आहेत.

सकाळी नऊ-दहा वाजता पदयात्रेसाठी बाहेर पडल्यानंतर घरी परतण्यास एक-दोन वाजून जातात. त्यानंतर काही ठिकाणी गठ्ठा मतदानाच्या बैठका होतात. दुपारनंतर पुन्हा पदयात्रा आणि रात्री मुख्य चौकात कोपरासभा घेतल्या जात आहेत. पदयात्रेमध्ये अग्रभागी हलगीवाले आणि उमेदवारांची छबी झळकविणारे डिजिटल पोस्टर्स घेतलेले कार्यकर्ते असे पदयात्रेचे सर्रास दिसणारे चित्र आहे.

**भाडोत्री प्रचारकांना भाव**

सांगली-मिरजेतील काही चौकात आजूबाजूच्या गावांतून दररोज सकाळी रोजगारासाठी मोठ्या संख्येने कामगार वर्ग डबे घेऊनच येतो. चौकात थांबून रोजगाराची प्रतीक्षा करतो. काम मिळाले, तर सायंकाळी पगार घेऊनच घरी परततो. या मजूरवर्गाला निवडणुकीत रोजगार मिळाला असून त्यांना सध्या भावही चांगला आहे. पदयात्रांमध्ये असे भाडोत्री मजुरांचे चेहरे अनेक ठिकाणी दिसत आहेत.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत